# प्रकरण चौथे

# धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव

| अ. क्र | घटक |
|---|---|
| **४.१** | **धार्मिक जीवन** |
| **४.२** | **सोलापूर शहरात दिसून येणारे धार्मिक ऐक्य** |
| **४.३** | **धर्मांतर प्रक्रिया** |
| **४.४** | **धार्मिक स्थळांचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव** |
| | ४.४.१ खाद्य संस्कृती |
| | ४.४.२ कानडी भाषेचा प्रभाव |
| **४.५** | **सण आणि उत्सव** |
| | ४.५.१ संक्रात व गड्डा यात्रा |
| | ४.५.२ दसरा (नवरात्र महोत्सव) |
| | ४.५.३ गणेशोत्सव |
| | ४.५.४ शुभराय महाराज रथयात्रा |
| | ४.५.६ मार्कंडेय रथ मिरवणुक |
| | ४.५.७ मुस्लिमांचे सण व उत्सव |
| **४.६** | **धार्मिक कार्यात महिलांचा सहभाग** |
| **४.७** | **धार्मिक स्थळांचा आर्थिक प्रभाव** |

# प्रकरण - चौथे

# धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव

धर्म हा कोणत्याही मानवी समुहाच्या जीवनातील कलेच्या विकासाचा पाया असतो असे ग्रूनवेडेल यांनी आपल्या 'बुध्दीस्ट आर्ट इन इंडिया' या ग्रंथात म्हटले आहे. असेच विचार डेला सेट या लेखकाने 'रिलीजन अँड आर्ट' या ग्रंथात मांडले आहेत. या दोघानींही भारतीय धर्म व कला यांचे नाते अतूट असल्याचे दर्शविले आहे. जगातील विविध धर्मातील आपापल्या प्रतिकात्मक देवदवतांच्या पूजेतून मूर्तिकलेचा व मंदिराचा विकास झाला. कौटुंबिक जीवन, जातीव्यवस्था, सामाजिक व आर्थिक जीवन अशा अनेक गोष्टी धार्मिक परंपरानीच कमी अधिक प्रमाणात नियंत्रीत केलेल्या आहेत. या धार्मिक परंपरा जतन करण्यासाठी विविध धार्मिक स्थळांची निर्मिती करण्यात आली. हीच धार्मिक स्थळे प्राचीन काळापासून भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे अंग बनली आहेत. या धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने अनेक यात्रा, उत्सव, सण, समारंभ याद्वारे आपल्या रूढी परंपरा जपण्याचा प्रयत्न समाज करतो. त्यामुळेच अशा धार्मिक स्थळांचा समाजजीवनावर प्रभाव पडलेला दिसून येतो.

## ४.१ धार्मिक जीवन

प्राचीन भारतात निर्माण झालेल्या हिंदू, जैन आणि बौध्द धर्माचा प्रभाव एकमेकांवर पडलेला आहे. भारतातील विविध धर्म, पंथ आणि भाषा व त्यांचे रितीरिवाज वेगवेगळे आहेत. भारतीय समाजाचे महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे येथे निर्माण झालेली जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था होय.[१] मध्ययुगीन भारतात हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये जीवनाच्या वेगवेगळ्या अंगामध्ये परस्पर संबंध, संयोग व मिलाफाची प्रक्रिया अखंडपणे चालू होती.

शिल्पकला व भाषा या क्षेत्रात हिंदू-मुस्लिम मिलाफामूळे एक नवीन निर्मिती होण्यास मदत झाली. मुस्लिम समाज हिंदू समाजाच्या सानिध्यात राहू लागल्याने एकमेकांच्या संस्कृतीचा प्रभाव परस्परांवर पडलेला दिसून येतो. सामाजिक चालिरिती आचार, विचार, नाणेपध्दती, कला व स्थापत्य या क्षेत्रात विचारांची देवाणघेवाण, समाधीवर दोऱ्या बांधण्याची पध्दत, भिक्षा मागणाऱ्या फकीरांचा पंथ, विशिष्ट धार्मिक समारंभात मुल्ला मौल्लवींचा प्रभाव, सर्वत्र होणारी पिरांची उपासना या सर्व बाबींवर हिंदुंचा प्रभाव पडलेला दिसून येतो.[२]

महाराष्ट्राची धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी अत्यंत समृध्द आणि संपन्न आहे. येथे सर्व धर्म शतकानुशतके एकत्र राहत आहेत. अशा विविध धर्मात हिंदू, मुस्लिम, जैन, बौध्द, ख्रिश्चन, पारशी, शीख, ज्यू, इत्यादी धर्म व पंथांचा समावेश होतो.[३] मध्ययुगीन महाराष्ट्रात इस्लामी राजवटीत देव-देवतांच्या संख्येत भर पडत गेली. खंडोबा, विठोबा, भवानी, महालक्ष्मी, गणपती, मारूती इत्यादी देव-देवताप्रमाणे वीर, झोटींग, वेताळ, खंकाळ, मेसको, मैनाळ, मेसाबाई, जानाई, जोखाई, मरिआई, लक्ष्मीआई इत्यादी देव-देवतांची विविध ठिकाणी स्थापना करून अशा देव-देवतांना नवसापोटी बकरे, कोंबडे, रेडा बळी देण्याची प्रथा सुरू झाली. हिंदू लोक मुस्लिम पिरांची भक्ती करू लागले आणि पिरांच्या उरूसात भाग घेऊ लागले. मुस्लिमही हिंदुंच्या देवतांना भजू लागले. शहा मुंतोजी बामणी हा सहजानंद स्वामीचा शिष्य होता. पुढे तो विठ्ठलाचा उपासक बनला त्याने 'पंचकिरण' नावाचा हिंदीतील ग्रंथ लिहीला असून हिंदु धर्मातील कितीतरी लोक मुंतोजीचे अनुयायी बनले होते.[४]

धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने सामाजिक व धार्मिक जिवनात अभिसरण प्रक्रिया झालेली दिसून येते. धार्मिक स्थळे व देवदेवतांच्या यात्रा-उत्सवाच्यावेळी विविध धर्माचे लोक एकत्रित येऊन आचार-विचारांचे अभिसरण घडवून आणतात. ही धार्मिक स्थळे लोकसंग्रहाची महत्त्वाची ठिकाणे असली तरी, त्या ठिकाणी हेणाऱ्या आर्थिक उलाढालीतून होणारे बदल धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने होणारे आर्थिक अभिसरणच होय. देव-देवता, मंदिरे, मठ, मशिदी, दर्गे, या ठिकाणी प्रवचन, किर्तन, भारूड, व्याख्याने, कव्वाली इत्यादिंच्या माध्यमातून विचारांचे अभिसरण होण्यास मदत होते. त्यामुळे माणसांच्या मनातील पारंपरिक विचारात बदल झालेले दिसून येतात.

सोलापूर शहर आणि परिसरात विविध धर्माचे लोक मोठ्या प्रमाणावर राहतात. हिंदु धर्मात वारकरी, दत्त, नाथ, लिंगायत आणि नागेश संप्रदायाचे लोक मोठ्या प्रमाणावर आहेत. मुस्लिमांमध्ये सिया व सून्नी, जैनामध्ये श्वेतांबर व दिगंबर अशा पंथीयात लोक विभागले आहेत. 'कल्पतरू' या वृत्तपत्राच्या वर्णनावरून सोलापूर शहरात मराठा, लिंगायत, वाणी यांचा भरणा जास्त होता. ब्राह्मणांची संख्या कमी होती. पद्मशाली आणि मोमीन लोकांची वस्ती मोठ्या प्रमाणावर या शहरात आढळून येते.[५] शहरात अस्पृश्यता पाळली जाई, शिवाशिव, विटाळ, चांडाळ याचे प्रस्थ होते. आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी चांभार लोक चपल्या विकण्यासाठी ऐन बाजारात बसत. शिवाशिव होऊ नये म्हणून त्यांना बाजाराच्या एका बाजूला बसविल्याची उदाहरणे सापडतात. शहरातील ब्राह्मण

लोक शहर व परिसराच्या गावातून धार्मिक विधी पार पाडीत. लिंगायत व जैन लोक व्यापारात अग्रेसर होते  तर पद्‌मशाली लोकांनी आपल्या बरोबर आणलेल्या विणकराचा व्यवसाय सोलापूर शहरात भरभराटीस आणला होता.[६]

पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे आद्यपीठ जिल्ह्यातच असल्याने सोलापूर शहरात वारकरी संप्रदायाचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून आला. सर्व जाती धर्माचे लोक वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत. उपास-तापास, यज्ञ-याग, अनुष्ठाने अशा कर्मकांडापासून हा पंथ दूर असल्याने विठ्ठलाच्या निस्सिम भक्तीमुळे सोलापूर शहरात या पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते.[७] वारकरी पंथाचे अनेक मठ आणि फड अस्तित्त्वात आहेत, या मठाशी, फडाशी तसेच दिंडीशी शहरातील लोक संलग्न आहेत. शहरातून दरवर्षीच्या माघवारीस जवळजवळ १०० दिंड्या पंढरपूरास जातात. चैत्री, आषाढी, आणि कार्तिकी वारीसही हजारो वारकरी पंढरपूरास जातात. शहरातील नाशिककर महाराजांनी सुरू केलेली माघवारी दिंडीची परंपरा आजही अखंडपणे चालू आहे. नाशिककर महाराजांच्याच काळात श्री ढगे, बाजी आण्णा महाराज, सावता बाबा इत्यादींनी शहरात वारकरी संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. त्यांच्या प्रभावाने शहरातील हजारो लोक या संप्रदायाकडे वळले.[८]

देवगिरीच्या यादवांच्या काळात सोलापूर परिसरात वीरशैव संप्रदायाचे महत्त्वाचे केंद्र होते. या पंथाचे थोर संत श्री सिध्दरामेश्वर यांचे मूळ ठिकाण सोन्नलगीस वीरशैव पंथीयांचे महत्त्वाचे ठिकाण म्हणून प्रसिध्दी मिळाली होती. श्री सिध्दरामेश्वरांचे वीरशैव पंथाच्या प्रसाराचे कार्य महत्त्वाचे असून, त्यानी त्यासाठी शहराच्या सभोवती ६८ शिवलिंगाची केलेली स्थापनाही तितकीच महत्त्वाची वाटते. सन ११६० मध्ये होऊन गेलेल्या बसवेश्वरांच्या बहिणीचा मुलगा चन्नबसव यानीही वीरशैव पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. श्री सिध्दरामेश्वर आणि चन्नबसव यांनी केलेला वीरशैवाचा प्रसार सोन्नलगी व परिसरात झाला.[९] मूळातच सोलापूर शहर हे महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्याच्या सीमेवरील शहर असल्याने कर्नाटकात स्थापन झालेल्या या पंथाचा प्रभाव शहरावर पडल्याने[१०] शहरात लिंगायताची अनेक धार्मिक स्थळे निर्माण झाली. त्यामध्ये सिध्देश्वर देवस्थान, मल्लिकार्जून मंदिर, रेवणसिध्देश्वर मंदिर, बृहन्मठ होटगी, नंदीमठ, किरिटस्वामी मठ, रूद्राबिंका मठ इत्यादी धार्मिक स्थळांचा समावेश होतो. कन्नड ही वीरशैव पंथीयांची धर्मभाषा आहे. या भाषेने

वीरशैव धर्माच्या प्रसार कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सोलापूर शहरात ही भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण जवळजवळ ११.५% आहे.[११]

हिंदू धर्माप्रमाणेच जैन, इस्लाम, ख्रिश्चन, पारशी आणि बौध्द धर्मियही शहरात स्थिरावले. इस्लाम संप्रदायाच्या प्रसारानंतर शहरात अनेक ठिकाणी मशिदी, दर्गे आणि पिरांच्या समाधी बांधून त्यांची भक्तीभावाने उपासना सुरू झाली. व्यापारासाठी आलेले जैन, मुस्लिम, गुजर, मारवाडी इत्यादींनी आपापल्या धार्मिक स्थळांची निर्मिती केली. अशा या धार्मिक स्थळांचा पगडा शहरातील लोकांवर पडल्याने सामाजिक जीवनात राष्ट्रीय एकात्मता रूजण्यास मदत झाली.[१२]

## ४.२ सोलापूर शहरात दिसून येणारे धार्मिक ऐक्य

डरखाईमच्या मते 'एका वंशाचे लोक एकत्र जमल्यानंतर त्यांच्यात धार्मिक भावना निर्माण होतात. आदर्श समाज रचनेमध्ये धर्माचे महत्वाचे स्थान असते. धर्मामुळे व्यक्तीला समाज प्रतिष्ठा प्राप्त होते. समाजात धर्म मानवाच्या अस्तित्त्वाला अर्थ प्राप्त करून देतो.' प्रत्येक धर्मातील चांगले संस्कार जाती-जातीतील, पंथा-पंथातील कडवेपणा नष्ट करणारे असतात. आपापल्या धार्मिक स्थळाबाबत धर्म संस्काराप्रमाणे प्रत्येक धर्मियांना वर्तन करण्याची परवानगी असली तरी इतर धर्मियांच्या बाबतीत सहिष्णूवृत्ती असल्याचे दिसून येते. धार्मिक एकतेबाबत मूर्तिपूजेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मूर्तिपूजेमूळेच सामाजिक जीवन स्थिर व एकात्म होण्यास मदत होते.[१३]

शहरात हिंदु-मुस्लिम पंथीयाचे उत्सव दोन्ही धर्मातील लोक आनंदाने एकत्रीतपणे साजरे करतात. रमजान आणि बकरी ईद सणाच्यावेळी हिंदु-मुस्लिम बांधव एकमेकांना अलिंगन देतात. तर दिवाळी, दसरा या हिंदुच्या सणात मुस्लिम बांधव सहभागी होतात. त्यामुळे सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणावर धार्मिक ऐक्य साधनाचा प्रयत्न झालेला आहे. लिंगायत पंथाचा प्रभाव असलेल्या सिध्दरामेश्वरांच्या यात्रेप्रसंगी शहरातील सर्वधर्मिय बांधव एकत्रित येऊन मोठ्या उत्साहाने यात्रेत सहभागी होऊन धार्मिक एकतेचे प्रदर्शन करतात. गौतम धर्मसूत्रात सांगितल्याप्रमाणे सोलापूर शहरात सर्वधर्मसमभाव दिसून येतो. ज्ञानेश्वरांच्या पसायदानातून, कुराणाच्या सूरूतिहामध्ये, जैन धर्मियांच्या पंचनमस्कारात, बुध्दाच्या प्रार्थनेत आणि बसवेश्वराच्या वचनातून जे धार्मिक विचार आलेले आहेत त्यातून शहरात धार्मिक ऐक्य साधलेले दिसून येते.

दिगंबर पंथीय जैन साधू धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी शहरातून नग्नावस्थेत फिरत हे लिंगायतांना मान्य नव्हते. त्यामुळे या दोन पंथीयामध्ये संघर्ष होता. सन १८२५ मध्ये जैन समाजाने शहरात व्यापाराच्या माध्यमातून आपले बस्तान बसविले असताना वरील संघर्षामुळे जैन लोकांच्या लग्नाच्या व देव-देवतांच्या मिरवणूका दिवसा निघत नसत. सन १८४० पासून यात बदल झाला. जैन महायती ऐल्लक पन्नालाल हे चातुर्मासाकरीता सोलापूर शहरात आले होते. यावेळी त्यांचा केशलोचनाचा कार्यक्रम आयोजीत केला होता. या कार्यक्रमाला आप्पासाहेब वारदाना निमंत्रित करण्यात आले होते. शहरातील जैन बांधवांना हा केशलोचनाचा समारंभ नवीन होता. त्यामुळे या कार्यक्रमास शहरातील जैन लोक मोठया संख्येने उपस्थित होते. केशलोचन म्हणजे हातानेच डोक्याचे व दाढीचे केस सहज लिलेने लोचने (उपटणे) होय. याप्रसंगी जैन लोकांविषयी सहिष्णूतता प्रकट करून आप्पासाहेब वारदांनी जैन संस्थेस ५०० रूपयाची देणगी दिली.[१४] आप्पासाहेबांनी या कार्यक्रमास हजेरी लावल्याने जैन व लिंगायत पंथीयातील वाद संपुष्टात आला.

पहिल्या महायुध्दाच्या वेळी ब्रिटीश सरकारला युध्दात विजय मिळावा म्हणून शहरात सार्वजनिक उपासना करण्यात आली. हिंदू धर्मियाचे धर्माधिकारी, ग्रामजोशी, वैदिक मंडळी इत्यादींच्या नेतृत्त्वाखाली कसब्यातील विठ्ठल मूर्तीस, सिध्देश्वर मंदिरातील सिध्देश्वर मूर्तीस, गणपतीस आणि त्रिपूरातंकेश्वरास अभिषेक करण्यात आले होते. नव्या पेठेतील राम मंदिरातील रामाची, काळजापूरच्या मारूतीची, रजपूत मठातील मारूतीची पूजाअर्चा करण्यात आली. तसेच चौपाडातील डबक्या मारूतीजवळ, हिंगुलांबिका देवी मंदिरात आणि शहरातील विविध मंदिरातून भजनाचे कार्यक्रम करण्यात आले. शुभराय मठ व जुने राममंदिरात पूराणे वाचण्यात आली. कालिकादेवी मंदिरात पांचाळ सोनाराची सभा भरवून पटवर्धन व शिलवंत वकीलानी आपल्या भाषणातून ब्रिटीशांनी पहिल्या महायुध्दात विजय मिळवला हे लोकांना सांगितले होते. शहरातील मुस्लिम बांधवानीही युध्दात ब्रिटिशांना विजय प्राप्त व्हावा म्हणून प्रार्थना व नमाज अदा केले. जामा मशिद, मक्का मशिद येथे खान बहादूर पीर अहमद, जाफरसाहेब, फक्रूद्दीन लाडलेसाहेब यांनी प्रार्थना केल्या. शहरातील मोदीखान्याच्या मारूती मंदिरात, आदिनाथ जैन मंदिर, सिध्देश्वर मंदिर आणि जामा मशिदीमध्ये लोक एकत्रीत आले आणि त्यावेळी भजन, किर्तन व प्रार्थनेद्वारे ब्रिटिशांचा विजय व्हावा हे मनोमन इच्छिले. सोलापूर शहराचे तत्कालिन कलेक्टर बहादूर साहेब व पोलीस अधिकारी प्रभू तिवडे इत्यादी सरकारी अधिकारी याप्रसंगी हजर होते.[१५] यावरून असे दिसून येते की,

शहरातील सर्वधर्मिय लोक राष्ट्रीय आपत्ती, भारतीय स्वातंत्र्य लढा अथवा सामाजिक प्रसंगावेळी एकत्रीतपणे सहभागी होतात.

उरूस व यात्रेच्या अनुषंगानेही शहरातील सर्वधर्मिय लोक एकत्र येतात. शहरात ज्यावेळी पिरांचे उत्सव साजरे केले जातात त्यावेळी मुस्लिमांबरोबर हिंदू धर्मियही सहभागी होतात. रेल्वे स्टेशनजवळील भैय्या चौकात असणाऱ्या जंग बहादूर सलाबतखानबाबा पीराच्या उत्सवाप्रसंगी हिंदू बांधवही सहभागी झाले होते. मोदीतील नारायण लेझीम पार्टीने यात सहभाग घेतला होता. शहरातील मिल कामगाराचे पुढारी भिमराजे, तसेच बसप्पा विभूते, रामलू भैय्या, हनिप तांबोळी या प्रतिष्ठीत लोकांबरोबर शहरातील तीन ते चार हजार सर्वधर्मिय लोक या उत्सवात सहभागी झाले होते. बडे मौलाली पिराच्या ताबूताच्या मिरवणूकीत मशाल धरण्याचा मान अदिलशाही काळापासून आजतागायत गुरू सिध्दाप्पा शेटे या हिंदू घराण्याकडे आहे.[१६]

सन १९४३ मध्ये जानेवारी महिन्यात मोहरम व सिध्देश्वराची यात्रा एकत्र असल्याने मोहरम व काठ्यांची मिरवणूक एकाच दिवशी काढण्यात आली होती. यावेळी शहरात शांतता नांदावी म्हणून कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली जबाबदार हिंदू-मुस्लिम समाजातील निमंत्रित नागरीकांची बैठक घेण्यात आली होती. वरील मिरवणूकीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून दोन्ही समाजातील पुढाऱ्यांनी आपापल्या धार्मिक अडचणी व मिरवणूकीचे रस्ते बदलण्याचे प्रश्न यावर चर्चा करून मिरवणूकीच्या वेळा आणि मार्ग बदलण्यास अनुमती दर्शविली होती.[१७]

सन १९४६ मध्ये साखर पेठेतील पीराच्या सवारीच्या मिरवणूकीमध्ये हिंदू व शांतता कमिटीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. मुस्लिम लिगचे नॅशनल गार्डस् व कॉंग्रेसच्या राष्ट्र दलाच्या सैनिकांनी मिरवणूकीची चोख व्यवस्था ठेवली होती त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.[१८] ५ डिसेंबर १९४६ रोजी मौलाली पंजाच्या अभूतपूर्व मिरवणूकीत मुस्लिमबरोबर हिंदूंचाही सहभाग होता. त्याचवेळी काढण्यात आलेल्या मौलाली अकबर अली व घोडेपीर पंजाच्या मिरवणूकीत शेवटपर्यंत शांतता कमिटीचे हिंदू आणि मुस्लिम सभासद हजर होते. अकबर अलीच्या पंजापुढे लिगचे व कॉंग्रेसचे झेंडे एकत्र फडकत होते. मुस्लिम लिगचा झेंडा गांधी टोपी घातलेल्या व्यक्तीने धरला होता. तर कॉंग्रेसचा झेंडा मुस्लिम व्यक्तीने धरला होता. हिंदू आणि मुस्लिम हे आपापल्या धार्मिक भावना बाजूस ठेवून एकमेकात मिसळत असत.[१९]

शहरात सर्वत्र शांतता नांदावी यासाठी सोलापूरचे तत्कालीन सेवानिवृत्त मामलेदार मा. कृ. शिंदे यांनी आपल्या निवेदनात म्हटले होते की, 'शहर व मोहल्ला शांतता कमिट्यांना तसेच सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांना सर्वधर्मिय पुढाऱ्यांनी वेळोवेळी

ईश्वर अल्ला तेरे नाम । सबको संमती दे भगवान ।

मज्जीद मंदिर तेरे धाम । सबको संमती दे भगवान ।

या भजनाचा व किर्तनाचा अर्थ पटवून देऊन लोकांच्या मनाचे परिवर्तन घडवून आणावे त्यासाठी सर्वधर्मियांनी एक कमिटी स्थापन करावी. मंदिर वा मज्जिद असो किंवा चर्च ही सर्व परमेश्वराची वसतीस्थाने आहेत. सबब हिंदूंनी मशिदीस व मुस्लिमांनी मंदिरास पूज्य मानावे व एकमेकांचा आदर करावा व धार्मिक भावनाना राजकीय स्वरूप देऊ नये. धर्मात राजकारण घुसडले तर बेबनाव होतो'.[२०] अशा प्रकारे शहरात शांतता नांदावी म्हणून प्रयत्न केले जात होते.

सोलापूर शहरात सर्वधर्मसमभाव दिसून येतो त्याचेच एक उत्तम उदाहरण म्हणजे निलमनगर भागातील नल्ला कुटुंबीय होय. त्यांच्या घरात दरवर्षी नवरात्रात भवानी देवीची पूजा, गणेशोत्सवात गणपतीची प्रतिष्ठापना आणि मोहरम सणाच्या उत्सवाप्रसंगी मुस्लिम धर्मियांच्या रितीरिवाजाप्रमाणे मौलाली पंजाची प्रतिष्ठापना करून सवारीची मिरवणूकही काढली जात. याप्रसंगी हिंदू आणि मुस्लिम समाजातील लोक सहभागी होतात. उत्सव काळानंतर वर्षभर भवानी माता, गणपती आणि मौलाली पंजाचे वास्तव्य नल्ला यांच्यात घरात असते.[२१]

गड्डा यात्रेच्या वेळी नंदीध्वजाच्या मिरवणूकीत शहरातील सर्व जाती धर्माचे लोक सहभागी होतात. यात सात नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. पहिला नंदीध्वज हा सिध्देश्वर देवस्थानचा, दूसरा कसब्यातील देशमुखांचा, तिसरा लिंगायत माळी समाजाचा, चौथा ब्राह्मणांचा, पाचवा सुतार समाजाचा, सहावा मातंग समाजाचा व सातवा दलित समाजाचा अशा प्रकारे प्रत्येक जाती धर्मातील लोकांना या नंदीध्वजाचा मान मिळालेला आहे.[२२] ही सर्वधर्मसमभावाची महत्त्वाची उदाहरणे आहेत.

## ४.३ धर्मांतर प्रक्रिया

हिंदू धर्म सोडून गेलेल्यांना परत हिंदू धर्मात घेण्याची कांही प्रकरणे सोलापूर शहरात घडून आली आहेत. संबंधीत व्यक्तीला स्वधर्मात येण्यासाठी प्रायश्चित घ्यावे लागे. तिर्थ, प्रदक्षिणा घालणे,

तीर्थस्नान करणे इत्यादी उपाय सुचविलेले होते.[२३] १९३३ साली शहरात स्थायिक झालेले अमरावतीचे रा. रा. जॉन शामनाथ जोशी या ख्रिश्चन गृहस्थास हिंदू महासभेच्यावतीने शुध्दी संस्कार देऊन हिंदू करून घेण्यात आले. हा शुध्दीकरणाचा कार्यक्रम २७ जानेवारी १९३३ रोजी शहरातील नव्या पेठेतील राम मंदिरात पार पडला.[२४] सन १९४१ मध्ये मि. आणि मिस लिलि (इटालियन) यांचाही या राम मंदिरात शुध्दीसमारंभ करून त्यांना हिंदू धर्मात घेण्यात आले. शुध्दी समारंभानंतर त्यांची नावे शरणसिंग आणि लिलावती अशी ठेवण्यात आली आणि हिंदू पध्दतीने त्यांचा विवाह पार पाडला. त्यावेळी पौरोहित्याचे काम आर्य समाजाचे पंडित वसंतराव गंगाराम आर्य यांनी केले.[२५] वधू वरांना भगवद्‌गीतेची प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. अशाप्रकारचा शुध्दीसमारंभ वाडीया हॉस्पिटलमधील डॉ. बी. धनकवडे व नर्स माणिकबाई जयंतराव रानडे या दोन ख्रिश्चन धर्मियांना हिंदू धर्माची दीक्षा देऊन शुध्दीकरणानंतर त्यांचाही विवाह लावून देण्यात आला. तसेच १९४३ मध्ये शहरातील साखर पेठेत राहणारे दत्तात्रय आशण्णा पूठ्ठा या पद्‌मशाली युवकाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता परंतू अवघ्या २० दिवसात त्याचेही शुध्दीकरण करून त्यास हिंदू धर्मात घेण्यात आले. यावरून असे दिसते की, शहरात धर्मांतरण प्रक्रिया या धार्मिक स्थळामध्ये पार पाडल्या जात.

## ४.४ धार्मिक स्थळांचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव

धार्मिक स्थळांचा आणि मानवी जीवनाचा अतिशय जवळचा संबंध आहे. धार्मिक स्थळे ही निसर्गाच्या सानिध्यात नद्यांच्या उगमस्थानी, नद्यांच्या संगमावर, गिरी शिखरावर, गुहामध्ये आणि सागर किनारी पहावयास मिळतात. भारतीय लोक धार्मिक स्थळाशी निगडीत आहेत. सोलापूर शहरात असणाऱ्या सर्व जाती धर्माच्या धार्मिक स्थळांमध्ये यज्ञयाग, उत्सव, मंगलकार्य, अन्नदान, सामुदायिक विवाह सोहळे पार पाडले जातात. एवढेच नव्हे तर पाठशाळा, गोशाला आणि बालसंगोपन करण्याचे कार्यही पार पाडले जाते. नृत्य, संगीत, चित्रकला इत्यादी कलांना मंदिरात आश्रय दिला जातो. समाजाची अभिरूची उच्च दर्जाची व्हावी म्हणून या कलांना अध्यात्मिक साधना मानले जाई. पहाटे सनई चौघडे, रात्रीची आरती यामुळे सारा गाव अध्यात्मिक बने. त्यामूळे ही धार्मिक स्थळे समाजाच्या विविध अंगांना स्पर्श करणारी केंद्रे होती.[२६] सामाजिक चालीरिती, आचार विचार, रूढी परंपरा, सामाजिक संस्था, श्रध्दा, मूल्य, निष्ठा इत्यादीचा समावेश संस्कृतीच्या अध्यात्मिक अंगात होतो. अशा संस्कृतीच्या घडणीमध्ये धार्मिक स्थळांचा फार मोठा वाटा आहे.

धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने संस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न समाजाकडून होत असतो, समाजाची ती आदर्श जीवन पध्दती असते.[२७] सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर कळत नकळत प्रभाव पडलेला दिसून येतो.

शहरातील लोकांवर मराठी, कानडी, तेलगू संस्कृतीचा असणारा प्रभाव हा आचार-विचार अन्न-वस्त्र, बोली भाषेचे वळण, सण-समारंभ इत्यादी घटकामधून दिसून येतो. कर्नाटक प्रांतातील महिला इरकली साडी आणि चोळी वापरतात. पुरूष धोतर व कुर्ता वापरतात. स्त्रिया आपल्या केसांचा आंबाडा घालतात क्वचीत प्रसंगी त्या वेणी घालतात. असा पेहराव सोलापूर जिल्ह्यात स्त्रि-पुरूषांच्या बाबतीतही पहावयास मिळतो.[२८] ब्रिटिशांच्या आगमनानंतर शहरातील ब्राह्मण लोकांच्या वेशभूषेत फरक पडत गेला. ब्राह्मण मंडळी आपल्या शेंडीबरोबर सजांप राखत व गालमिशा ठेवत. सन १८९९ ते १९१८ या काळात रा. सा. पित्रे हे सोलापूर येथे मुख्याधिकारी होते. त्यांनी सन १९०२ मध्ये मिशा काढण्याच्या पध्दतीला सर्वप्रथम चालना दिली. वेशभूषेच्या बाबतीत त्यावेळचे शहरातील ब्राह्मण डोक्यावर पुणेरी पागोटे, अंगात बाराबंदी, त्यावर पेशवाई पध्दतीचा लांब अंगरखा, नागपूरी पंचाचे उपरणे आणि पायात पूणेरी जोडा घालत. शहरात पहिल्यांदाच बुटाचा वापर व विडी ओढण्याची सुरूवात बापूसाहेब किर्लोस्कर यांनी केली. सिगारेट आणि चहाचा मागमूसही तत्कालीन जनतेला माहित नव्हता.

स्त्रिया कपाळावर कुंकू लावीत व केसांच्या वेण्याही घालत. चुकून जर कुणी केसांचा आंबाडा बांधला तर अशा स्त्रियांना कुणबीणी म्हणून लोक दोष देत. स्त्रिया नारायण पेठची लुगडी, महेश्वरी पुणेरी लुगडी आणि नागपूरी पातळे वापरत, दंडापर्यंत चोळी असे. जोडवे, विरूदे, मंगळसुत्र, वेणीतील अगरफूल आणि कुंकू इत्यादी सौभाग्य अलंकारही वापरत. शहरातील लिंगायत लोक लिंगायत पध्दतीची पगडी, अंगात बाराबंदी आणि सणावारास लांब अंगरखा घालीत. तसेच कपाळावर भस्म लावत.[२९] लिंगायत समाजात सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाणी भरताना घागरीवर फडके झाकून पाणी आणले जाई.[३०] मुस्लिम लोक धोतीऐवजी पांढरा सूती पायजमा, लांब अंगरखा आणि डोक्यास जिना टोपी घालत व स्त्रिया सलवार आणि कमीज वापरत.[३१]

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात वडार समाजातील स्त्रिया चोळीचा वापर करीत नसत. परंतू शहरातील विविध धार्मिक संस्कृतीच्या प्रभावामूळे यामध्ये बदल घडून येण्यास सुरूवात झाली. वडार

समाजातील पाथरवट घराण्यातील शिवराम बंदपट्टे या तरूणाने अक्षय तृतीयाच्या मूहूर्तावर चोळी न घालण्याची परंपरा मोडीत काढली. अशा प्रकारची परंपरा मोडीत काढल्याने वडार समाजातील पंचायतीने शिवराम बंदपट्टे यास धर्म बहिष्कृत करून त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्यास ५० रूपये दंडाची शिक्षा ठेवली होती. यामुळे बंदपट्टे यांनी आपल्यावरील हा अन्याय दूर व्हावा म्हणून १६ जुलै १९४२ पासून अन्न सत्यागृह करण्याचे जाहीर केले होते. त्याचाच परिणाम म्हणून सोलापूर शहरामध्ये वडार समाजातील स्त्रियांनी चोळीचा वापर करावा या हेतूने न्यू पाच्छा पेठेतील मारूती मंदिरात समाजातील नेते काशिनाथ लक्ष्मण लिंबोळे यांनी जाहीरपणे स्त्रियांना चोळीदानाचा (घालण्याचा) समारंभ पार पाडला. हा समारंभ फक्त सोलापूर शहरातील वडार समाजातील स्त्रियांसाठी नव्हता तर विजापूर जिल्ह्यातील अंजुरगी, कन्नूर, आगणसाळ, गिरगावी व होटगी येथील वडार समाजातील स्त्रियांचाही त्यात समावेश होता. या जाहीर चोळीदानाच्या समारंभामुळे या समाजात बरीच खळबळ माजली होती.[३२] शहरातील वडार समाजातील स्त्रिया आज आपल्या पेहरावामध्ये अंगात चोळीचा वापर करीत आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, समाजातील विविध गट पहिल्यापासून काही विशिष्ट सांस्कृतीक आदर्श मानत आल्याने त्यांच्यात सांस्कृतिक एकात्मेची भावना टिकून राहिलेली आहे.

### ४.४.१ खाद्य संस्कृती

महाराष्ट्र आणि कर्नाटकात ज्वारीचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. त्यामुळे ज्वारीची भाकरी लोकांच्या जेवणात असते. ज्वारीची व बाजरीची कडक भाकरी, शेंगदाणा चटणी, लसून चटणी, झुणका, तूरदाळ-भात, निरनिराळया पालेभाज्या व दुग्धजन्य पदार्थांचा जेवणात समावेश असतो. ब्राह्मण, जैन, लिंगायत हे शाकाहारी जेवण घेतात, तर मुस्लिम लोक मांसाहार करतात.[३३] कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील लोकांच्या जेवणात हुग्गी, चित्रान्न, शेंगाची पोळी, भात व मसलपप्पू या पदार्थांचा मोठया प्रमाणात समावेश असतो. असेच अन्नपदार्थ सोलापूर शहरातील लोकांच्या जेवणातही असतात.[३४] कर्नाटकप्रमाणे सोलापूर शहर व जिल्ह्यातही अनेक पुरूष व स्त्रियाही तंबाखू, भांग, अफु, गांजा अशा मादक पदार्थांचे सेवन करतात.[३५]

### ४.४.२ कानडी भाषेचा प्रभाव

सोलापूर शहरावर कर्नाटकातील कानडी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. कर्नाटकात आई या शब्दासाठी 'अव्वा', वडीलासांठी ' आप्पा', वडीलबंधूसाठी 'आण्णा' व बहीणीसाठी 'आक्का' या

शब्दांचा वापर केला जातो. सोलापूर शहर व परिसरातही वरील शब्दांचा वापर सर्रास होतो. लोकांच्या बोलीभाषेवर या शब्दाचा प्रभाव जाणवतो. शहरात असणारे मुस्लिल लोक उर्दू बरोबरच मराठी आणि कन्नड भाषेचा दैनंदीन व्यवहारात वापर करतात.[३६]

## ४.५ सण आणि उत्सव

सण आणि उत्सव हे भारतीय संस्कृतीमधील महत्त्वाचे घटक आहेत. सण, उत्सव, कूळधर्म, कूळाचार हे आपल्या पूर्वजांनी, ऋषीमुनींनी आचरणात आणल्याने त्याचा प्रभाव मानवी जीवनावर पडलेला आहे. सण, उत्सव आणि यात्रा इत्यादीच्या माध्यमातून माणसांच्या आचार विचाराची देवाण घेवाण होते व समाज संघटीत होण्यास मदत होते.[३७] सोलापूर शहरात सर्व धर्मीय लोक आपापले सण साजरे करतात. गुढी पाडवा, दिवाळी, दसरा, संक्रांत, होळी, रमजान, बकरी ईद, मोहरम, नाताळ, पतेती इत्यादी सणांचा त्यात समावेश होतो.[३८] शिवाय शहरातील विविध धार्मिक ठिकाणी असणाऱ्या देव-देवताचे उत्सवही साजरे होतात. मूर्तीपूजेच्या सार्वजनिक स्वरूपामुळे त्या त्या क्षेत्राच्या ठिकाणी विविध प्रांतातून लोक येतात. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वराची गड्डा यात्रा मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.[३९] या यात्रेस महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील विविध प्रांतातून लोक हजेरी लावतात. त्यामुळे या यात्रेस राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.[४०]

### ४.५.१ संक्रात व गड्डा यात्रा

संपूर्ण भारतभर संक्रांतीचा सण साजरा केला जातो. या सणात तिळास महत्त्व आहे, तिळगूळ हे स्नेहाचे प्रतिक मानले जाते. सामाजिक जीवनात स्नेहभाव रूजावा, लोकांनी सुखाने व आनंदाने राहावे, एकमेकांविषयी आपल्या मनात राग, व्देष धरू नये आणि प्रेम व मैत्री वृद्धींगत व्हावी हीच या सणामागची उदात्त भावना आहे. सोलापूर शहरात हा सण हा मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. या सणाच्या जोडीला सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर देवस्थानची यात्रा मोठ्या प्रमाणावर साजरी होते. मकरसंक्रांती हा यात्रेचा मुख्य दिवस असल्याने या यात्रेस महत्त्व प्राप्त झाले आहे.[४१] ८०० वर्षाची परंपरा असलेल्या या यात्रेत नंदीध्वजाची मिरवणूक, तैलाभिषेक (यण्णा मिज्जन) अक्षता सोहळा, होम प्रतिपद असे धार्मिक विधी होतात.[४२] नंदीध्वज मिरवणूकीपूर्वी ३० ते ४० दिवस नंदीध्वज पेलण्याचा सराव केला जातो. त्यास मन एकाग्र करावे लागते, शिवाय आहारात बदाम, अंजीर, थंडाई, फळे, दूध, जोडगव्हाची खीर आदी पौष्टिक खुराक असतो.

सिध्देश्वर मंदिर परिसरातील मातीच्या टेकड्याला 'गड्डा' ह्मणतात. याच परिसरात पूर्वी आणि आजही सिध्देश्वराची यात्रा भरते म्हणून या यात्रेस 'गड्डा यात्रा' म्हणतात.[४३] ही यात्रा १० जानेवारीस प्रारंभ होऊन ती १५ जानेवारीपर्यंत चालते. यात्रेच्या वेळी मिरवणूकीसाठी नंदीध्वज (काठ्या) निघतात, मुख्य काठ्यांना हळद, लोणी, तीळ, चंदन लावून स्नान घालतात व काठ्यावर तूडूप हारडे, पाटल्या, कळस, भगवा ध्वज, खेळणे व जरीचा पटका चढवून नंदीध्वजांना यात्रेच्या आदल्या रात्री साज चढविण्याचा कार्यक्रम होतो. याकाळात शहरात पेशव्यांची मुख्य कचेरी व चावडी लक्ष्मीच्या देवळाजवळील कलवडे यांच्या वाड्यात होती. त्याचठिकाणी नंदीध्वजास पेशवे सरकारकडून आहेर होत. आजदेखील त्याठिकाणी असणाऱ्या पसारे यांच्या वाड्यात जुनी फौजदार चावडीजवळ नंदीध्वजास 'फडी' बांधण्याचा कार्यक्रम साजरा होतो. ब्रिटिशांच्या काळात नंदीध्वजास फडी बांधण्याचा कार्यक्रम सोलापूरचे कलेक्टर अथवा मामलेदार यांच्या उपस्थितीत होत असे. आजही ती प्रथा चालू आहे.[४४]

पाच दिवस चालणाऱ्या या यात्रेची सुरूवात तैलाभिषेकाने (यणा मिज्जन) होते. तैलाभिषेक म्हणजे नंदीध्वजास आडवे करून तेलाने त्यावर अभिषेक केला जातो. नंदीध्वज्यांच्या मानकऱ्यांच्या घरी पाच दिवस अखंड दिवे तेवत ठेवले जातात.[४५] 'भोगी' हा यात्रेचा दुसरा दिवस असून यादिवशी सिध्देश्वर मंदिर परिसरातील समंती कट्याजवळ अक्षता सोहळा समारंभ होतो. 'समंती' वाचण्याचा मान शहरातील कसबा पेठेतील शेटे घराण्याचा असून तो अद्यापही चालू आहे. समंती म्हणजे श्रींच्या आज्ञा होय. आज्ञा वाचण्याचे जूने हस्तालिखीत या शेटे घराण्याकडे आहेत. यावेळी लग्न संस्कारातील सर्व विधी होतात. कल्पित वधू वरास बाशिंग बांधण्यात येते. संक्रांत हा यात्रेचा तिसरा दिवस असून यादिवशी सकाळी समंती कट्याजवळ योगदंड, पालखी व नंदीध्वजांना करमूटगी (हळद, तीळ, एखंड, ज्येष्ठ मध इत्यादी मिश्रण) लावून स्नान घालण्यात येते. याच दिवशी रात्री ९ वाजता होम मैदानावरील होम कुंडात धार्मिक पूजा झाल्यावर होम प्रज्वलन कार्यक्रम सुरू होतो. नंतर देशमुखाकडे असणाऱ्या वासराची सिध्देश्वर मंदिरासमोर प्रथेप्रमाणे पूजा होते आणि नंतर भाकणूकीचा कार्यक्रम होतो. भाकणूकीवेळी वासरापूढे विविध धान्य ठेवले जाते. वासरू ज्या धान्यास तोंड लावेल ते धान्य स्वस्त होते, वासराने जर त्या जागेवर मूत्र विसर्जन केले तर त्यावर्षी पाऊस चांगला पडतो असा येथील लोकांचा समज आहे.

'किक्रांत' या यात्रेच्या चौथ्या यादिवशी रात्री होम मैदानावर १० ते ११ या वेळेत शोभचे दारूकाम होते. यामधून लोकजागृतीचे धडे दिले जातात. पर्यावरण, मुली वाचवा, एडस्, महागाई, भ्रष्टाचार अशा विविध विषयांचा संदेश शोभेची दारू उडवताना दिसून येतो. यात्रेच्या पाचव्या दिवशी देशमुखांच्या वाड्यात योगदंडाची पूजा होते. रात्री बाळीवेशीत मल्लिकार्जून मंदिराला नंदीध्वजाबरोबर फेऱ्या होऊन 'कपडकळ्ळीचा' कार्यक्रम साजरा होतो. कपडकळ्ळीचा कार्यक्रम म्हणजे नंदीध्वजाला जो साज चढविला जातो तो साज उतरविण्याचा कार्यक्रम होय.[४६] यात्रेचे मुख्य आकर्षण नंदीध्वज असून यास श्री सिध्दरामेश्वराच्या काठ्या अथवा योगदंड म्हणण्याचा प्रघात आहे. योगदंडाचे प्रतिक म्हणून नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. योगदंडाचा मान शहरातील विविध जातीतील लोकांना मिळालेला आहे.[४७]

महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक राज्यतून लाखो भक्तगण सिध्दरामेश्वरांच्या यात्रेत सहभागी होतात त्यामुळे ही यात्रा महत्त्वाची मानली गेली आहे. या यात्रेच्या निमित्ताने सांस्कृतिक देवाण-घेवाण होऊन धार्मिक एकात्मता टिकून राण्यास मदत होते. यात्रेच्या निमित्ताने पाळणे, लहान मुलांचे मनोरंजनाचे खेळ, हॉटेल्स्, संसारोपयोगी साहित्य, चित्तथरारक खेळ, शेतकी प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, जनावरांचे प्रदर्शन, कुस्त्यांचे फड अशा विविध घटकांचे प्रदर्शन करून लोकांना यात्रेकडे आकर्षित केले जाते. यामधून फार मोठी आर्थिक उलाढाल होते

गड्डा यात्रेच्यावेळी शहरातून सिध्दरामेश्वराच्या काठ्यांची सवाद्य मिरवणूक काढली जाते. प्रसंगी शहरातील हिंदू-मुस्लिमामध्ये काही संघर्ष घडून आल्याची उदाहरणे आहेत. १९२५ मध्ये संक्रांतीच्यावेळी काठ्याची मिरवणूक मशिदीवरून सवाद्य नेल्याने हिंदू व मुस्लिमांमध्ये संघर्ष घडून आला होता. सन १९३० च्या मार्शल लॉ च्या प्रसंगात मलप्पा धनशेट्टी (लिंगायत), श्रीकिसन सारडा (मारवाडी), जगन्नाथ शिंदे (मराठा) आणि कुर्बान हुसेन (मुस्लिम) यांना देशद्रोही ठरवून १२ जानेवारी १९३१ रोजी या चौघांना फासावर लटकावल्यामुळे सिध्दरामेश्वराच्या यात्रेवर दु:खाचे सावट पसरले होते. तरीही अनेक वर्षाची परंपरा चालू राहावी म्हणून तरूण मंडळीच्या मतांचा विचार न करता सिध्देश्वर पंचकमिटीने धार्मिक प्रथा बंद होऊ नये म्हणून काठ्याची मिरवणूक काढली परंतू त्यादिवशी दुपारी अडीच वाजता शहरात १४४ कलम पुकारण्यात आल्याने निघालेली काठ्यांची मिरवणूक रद्द करून त्या काठ्या सिध्देश्वर मंदिरातच ठेवण्यात आल्या.[४८] आजही सोलापूर शहरात १२ जानेवारी हा दिवस 'हुतात्मा दिन' म्हणून पाळला जातो.

### ४.५.२ दसरा (नवरात्र महोत्सव)

शहरात दसरा (विजयादशमी) हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. शहरातील पार्क मैदानाजवळील शमी वृक्षाला प्रदक्षिणा घालून सोलापूरकर सीमोल्लंघन साजरे करतात. जुन्या काळात रेवणी मारूतीजवळ सीमोल्लंघनाचा कार्यक्रम साजरा केला जाई. नंतरच्या काळात शाहीर राम जोशी यांच्या शेतामध्ये असणाऱ्या शमी वृक्षाजवळ हा कार्यक्रम पार पाडला जाई. आज पार्क मैदानावर असणारा शमीचा वृक्ष हा शाहीर राम जोशींच्या शेतातीलच शमीचा वृक्ष आहे. या ठिकाणच्या शमी वृक्षाजवळ सीमोल्लंघन करण्यासाठी येणाऱ्या भाविकांची सेवा करण्याचा मान ग्राम जोशी यांच्या घराण्याकडे आजही आहे. समस्त ग्राम जोशीकडून सीमोल्लंघनासाठी येणाऱ्या भक्तांना मंत्रोच्चारात गंध लावून आपट्याची पाने दिली जातात.

पार्क मैदानावरील शमी वृक्षाजवळ सीमोल्लंघन करण्यासाठी रूपाभवानी मातेची पालखी, शुक्रवार पेठेतील शिवलाड तेली समाजाच्या श्री आंबाबाई मंदिरातील तुळजापूरास जाणारी मानाची पालखी, हिंगुलांबिका देवीची पालखी व नंदीध्वज, शहरातील सार्वजनिक नवरात्र मंडळांच्या मूर्ती सवाद्यासह मिरवणूकीने येतात. एकमेकांना सोने देवून स्नेह वृध्दींगत केला जातो. शहरातील सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन विजयादशमी सण साजरा करतात.[४९]

या काळात घराघरात, देवी मंदिरातून व सार्वजनिक ठिकाणी नऊ दिवस देवीचे घट बसविले जातात. नऊ दिवस घटाशेजारी फुलांची माळ चढत्या क्रमाने लावून चौकातून विविध मंडळाद्वारे देवीची उत्सवमूर्ती बसवून प्रतिष्ठापना केली जाते. दरम्यानच्या काळात होमहवन, सप्तशतीपीठ, नवचंडी याग इत्यादी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.[५०]

नवरात्र म्हणजे शक्तीदेवीचा उत्सव, या नऊ दिवसात देवी-देवतांचे स्मरण, मनन, चिंतन केले जाते. सोलापूरची कुलस्वामीनी व ग्रामदेवता रूपाभवानीदेवी एक शक्तीस्थळ म्हणून ओळखली जाते. घटस्थापना केल्यापासून कोजागीरी पौर्णिमेपर्यंत रूपाभवानी मातेचा उत्सव साजरा केला जातो. शहर व शहराबाहेरील हजारो भक्तगण रूपाभवानीमातेचे दर्शन घेऊनच तुळजापूरास अंबाबाईच्या दर्शनास जातात.[५१] नवरात्र काळात नित्यनियमाने नऊ दिवस देवीची नऊ प्रकारची पूजा बांधण्यात येते. दसऱ्याच्या दिवशी परंपरेनुसार रूपाभवानी देवीची पालखी मिरवणूक काढली जाते.[५२] विविध प्रांतातून सोलापूर शहरात येऊन स्थायिक झालेल्या अनेक जाती-धर्माच्या लोकांनी आपापल्या

कुलस्वामीनीची धार्मिक स्थळे शहरात निर्माण केली आहेत. त्यामध्ये गद्रे लक्ष्मी मंदिर, हिंगूलांबिका देवस्थान, चौडेश्वरीदेवी मंदिर, बनशंकरीदेवी मंदिर, कालिका माता आणि अंबाबाईदेवी मंदिरांचा समावेश होतो. या सर्व मातृदेवता मंदिरातून नवरात्र महोत्सवाच्या वेळी घटस्थापना करून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या शक्तीदेवतांच्या मंदिराप्रमाणे शहरात विविध चौका-चौकातून शक्तीदेवीची उपासना म्हणून शक्तीदेवीची प्रतिष्ठापना करून नवरात्र सार्वजनिक मंडळामार्फत विविध धार्मिक कार्यक्रम केले जातात.

२१ ऑक्टोंबर १९०२ रोजी नवरात्र महोत्सवात गद्रे यांच्या लक्ष्मी मंदिरात नायकीणींचा गाण्याचा कार्यक्रम झाला होता. गणेशपेठेतील भावसार शिंपी समाजाची कुलदेवता हिंगूलांबिका देवी मंदिरात नवरात्रानिमित्त मेळ्यांचे कार्यक्रम झाल्याचा उल्लेख सापडतो.[५३] शहरात आझाद हिंद चौक, जयहिंद चौक, काडादीचाळ, तुळजापूर वेस, साखर पेठ, मधला मारूती आणि फौजदार चावडी इत्यादी ठिकाणी असणारी मंडळे नवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करीत.[५४] शहरातील चारशे ते साडे चारशे नवरात्र मंडळे देवीसमोर विविध देखाव्याचे सादरीकरण करून लोकजागृती करतात.

### ४.५.३ गणेशोत्सव

शहरात गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाज जागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येते. गणेशाची उपासना सातवाहन काळापासून रूढ झाली. याच काळात गणेशाच्या मूर्ती तयार केल्या जात. यादवांच्या काळात शहरात मोठ्या चौकात गणपतीचे देऊळ बांधण्याची पध्दती असावी. ज्ञानेश्वरीत चौकातील गणपतीची माहीती मिळते. परंपरेने चालत आलेल्या गणेश उपासनेचे महत्त्व पुढे पेशवे काळात मोठ्या प्रमाणावर दिसून येते.[५५]

सन १९०० मध्ये पंढरपूर आणि १९०३ मध्ये सोलापूर शहरात हा उत्सव सार्वजनिक स्वरूपात सुरू झाल्याची माहिती मिळते.[५६] परंतू १९०२ मधील वृत्तपत्रावरून सोलापूर शहरात गणेशोत्सवानिमित्त पान-सुपाऱ्या, आरास, किर्तने, सप्ते व धार्मिक कार्यक्रम शहरात विविध ठिकाणी होत असत. कसबा पेठेतील सार्वजनिक गणपतीसमोर लेले वकील यांचे पुरूष सूक्तावरील किर्तन झाले होते.[५७] सन १९०३ मध्ये शहरात सार्वजनिक गणपतीची संख्या २० होती आणि त्याअनुषंगाने भरणारे मेळे हे १० होते. किराणा गल्लीचा गणपती, नरसिंग गिरजी मिलचा गणपती, मल्लप्पा

स्वामीचा गणपती व मेळा, खेत्री गल्लीचा गणपती व मेळा रामदासी गणपती, थोबडे गल्लीतील गणपती व मेळा, रावजी गल्लीतील गणपती, गणेश पेठेतील गणपती, साखर पेठेतील गणपती व मेळा, शनिवार पेठ, मिठ गल्ली, फौजदार चावडी गणपती इत्यादी गणेश मंडळे गणपतीची प्रतिष्ठापना करीत. गणेश विसर्जनाच्यावेळी शहरातून मिरवणूका काढल्या जात. या प्रसंगी मल्लखांब, भालाफेक, छडीपट्टा, दांडपट्टा, चक्कर फिरविणारे, लेझीम, ताशे, डफडे, शिंगाडे मिरवणूकीत सामील होत.[५८] गणेश विसर्जनाच्या मिरवणूका रात्री आठपर्यंत चालत त्यावेळी विजेची सोय नसल्याने गॅसबत्यांचा वापर होत असे. हे विसर्जन पाणीवेशीत असणाऱ्या विहिरीत आणि सिध्देश्वर तलावात गणपती घाटाकडील बाजूस होत असे.

सन १९०५ मध्ये शहरात सार्वजनिक गणपती मंडळाची संख्या २५ आणि मेळ्यांची संख्या १६ होती. गणेशोत्सवाच्या काळात असंघटीत लोकांना संघटीत करून त्यांच्यात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जाई. तसेच प्रवचन, किर्तन, व्याख्यानाद्वारे हा सण राष्ट्रीय वृत्ती जोपासण्याचे एक महत्त्वाचे साधन बनले होते. ब्रिटिशांच्या विरोधी डावपेच रचण्याची ही एक महत्त्वाची केंद्रे होती. पहिल्या महायुध्दाच्या काळात युध्दजन्य परिस्थिती आणि राजकीय पेचप्रसंगामुळे सोलापूरचे तत्कालीन डिस्ट्रीक्ट मॅजेस्ट्रेट यांनी एका आदेशान्वये गणपती मिरवणूकीस परवानगी नाकारली होती. त्यावेळी शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाने गणपती मूर्तींची विनावाद्य नेऊन प्रतिष्ठापना केली.[५९] शहरातील शांततेस बाधा येऊ नये म्हणून १८ सप्टेंबर १९४५ या दिवशी काढलेल्या आदेशात गणपती विसर्जनाच्या होणाऱ्या मिरवणूकीत कोणीही इसमास सोटे, काठ्या, बंदूका, पिस्तूल, चाकू, सुऱ्या, तलवारी, सोडा वाटरच्या बाटल्या जवळ बाळगण्यास मनाई केली होती.[६०]

अलिकडील काळात गणपती उत्सव मंडळाचे स्वरूप बदलेले आहे. शहरात १३०० च्या वर गणेशमंडळे असून या उत्सवासाठी सरकारी परवानगी घेणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे. मेळावे नष्ट होऊन त्याठिकाणी लेझीम संघ, डॉल्बी, लाऊडस्पीकर आले. परंतू गणेशोत्सवाचे महत्त्व कमी झाले नाही. सर्व जातीधर्माचे लोक या उत्सवात सहभागी होतात. काही गणेश मंडळांचे अध्यक्ष हे मुस्लिम समाजातील आहेत. उत्सवाच्या दरम्यान धार्मिक देखाव्याबरोबर अंधश्रध्दा निर्मूलन, मुली वाचवा, पर्यावरण, महागाई, भ्रष्टाचार, विज्ञानाचे फायदे-तोटे असे देखावे दाखविण्यात येऊ लागले त्यामुळे शहरात लोकजागृती झाल्याने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यास मदत झाली.

### ४.५.४ शुभराय महाराज रथयात्रा

शहरातील अनेक विठ्ठल मंदिराबरोबरच विठ्ठल भक्तांचे मुख्य ठिकाण संतकवी शुभराय महाराज मठ हे होय. आषाढी व कार्तिकी एकादशीस शुभराय महाराज यांनी रथांमध्ये कृष्णाची मूर्ती ठेऊन रथयात्रा काढण्याची परंपरा चालू केली. आज ही प्रथा बुवा परिवाराकडे आहे.[६१] या रथाचे मानकरी सोमवंशीय क्षत्रिय बांधव, क्षेत्रबंध, गवळी, मंदे, दास हे परिवार आहेत. सोमवंशीय आर्यक्षत्रीय समाज बांधव दशमीला या रथाची बांधणी करतात.[६२] मिरवणुकीसाठी वापरला जाणारा हा रथ लाकडाचा असून लाकडी पट्ट्यावर सुरेख नक्षी कोरलेली आहे. पाच फुट दिसणारा हा रथ संपूर्णपणे घडींचा असून जोडल्यानंतर चोवीस फुट उंच होतो. हा रथ ओढणाऱ्यांमध्ये हरिजनांचा समावेश असतो.[६३]

रथाच्या मिरवणुकीत शहरातील विविध धर्मांचे लोक, अनेक भजनी मंडळे, हातात भगवा ध्वज व डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या स्त्रियाही रथ मिरवणुकीत सहभागी होतात. सन १९४६ मध्ये कार्तिकी एकादशी व बकरी ईद हे दोन्ही सण एकाच दिवशी आले असता शुभराय महाराज रथाच्या मिरवणुकीत माणिक चौकातील मगरबी दर्ग्यातर्फे मि. इमारम साहेब फरशा यांनी रथाला पुष्पहार घातला होता.[६४]

### ४.५.६ मार्कंडेय रथ मिरवणुक

श्री मार्कंडेयऋषी हे पद्मशाली समाजातील लोकांचे कुलदैवत मानले जाते. हा समाज शहरात स्थिर झाल्यानंतर समाजाचे मार्कंडेय मंदिर स्थापन करण्यात आले.[६५] मार्कंडेय मुनीची रथ मिरवणूक ही श्रावण शुध्द पोर्णिमेस निघते. या मिरवणुकीच्या उत्सवास पद्मशाली लोक 'नुल्लूपुल्लम' या नावाने ओळखतात. गेल्या अनेक वर्षांपासून या रथ मिरवणुकीची परंपरा चालू आहे. या दिवशी मंदिरात पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनास गर्दी होते. पहाटे ४ वाजता मार्कंडेयांस पानपूजा व नंदीपूजा होऊन उत्सवास प्रारंभ होतो. श्रींच्या दर्शनानंतर समाज बांधव पुरोहिताकडून विधीवत यज्ञोपावित व सुताची राखी हातावर बांधून घेतात. या रथोत्सवात शहरातील अनेक भजनीमंडळे, सामाजिक संस्था, लेझीम संघ उत्साहाने सहभागी होतात.[६६] सकाळी १० वाजता सुरू झालेली ही मिरवणुक ठरल्याप्रमाणे रात्री १० वाजता मार्कंडेय मंदिरात विसर्जित होते. उत्सव काळात मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. रथोत्सवासाठी वापरला जाणारा रथ हा संपूर्णपणे

चांदीचा असून बैलजोडीच्या सहाय्याने तो ओढला जातो. नारळी पोर्णिमेस होणारा हा 'नुल्लूपुल्लम' सण पारंपारिक पध्दतीने रथोत्सवाच्या माध्यमातून साजरा केला जातो.[६७]

श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरे होतात. स्वकुळ साळी समाजाचे कुलदैवत श्री भगवान जिव्हेश्वर यांचा जन्म श्रावण महिन्यातील तिथी त्रयोदशीस झाला. महादेवाच्या जीभेपासून त्यांचा जन्म झाला अशी आख्यायिका सांगितली जाते. भगवान जिव्हेश्वराचा उत्सवानिमित्त शहरातील बेगम पेठेत स्वकुळ साळी विठ्ठल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याच मंदिरातून जिव्हेश्वराचा जयजयकार करीत जिव्हेश्वराच्या पालखीची मिरवणुक काढली जाते.[६८] शहरातील पाच्छापेठेत चिमटेश्वरांचे मंदिर असून हे तेलगु नाभिक समाजाचे कुलदैवत आहे. नागपंचमी दिवशी श्री चिमटेश्वराचा उत्सव साजारा होतो. यावेळी मंदिरात होम हवन, महापूजा असे कार्यक्रम होतात. शेकडो समाज बांधव आपली दुकाने बंद ठेवून या रथोत्सवात सहभागी होतात.[६९]

कुरूहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या वतीने गुरूवार पेठेतील निलकंठेश्वर मंदिरातून रथोत्सवास सुरूवात होते. चांदीच्या रथातून निलकंठेश्वरांची मिरवणुक काढली जाते. याचबरोबर परीट समाजाचे दैवत श्री वीरशैव मडिवाळेश्वर माचदेव यांची पालखी व रथोत्सव मिरवणुक कन्ना चौकातील श्री मडिवाळेश्वर माचदेव मंदिरातून निघते. यावेळी तेलगु गीतांवर लेझीम आणि डान्स पथक आपली कला सादर करतात.[७०] श्रावणातील दर रविवारी सिध्दरामेश्वरांचे गुरू रेवणसिध्देश्वर यांची पालखी मिरवणुक रेवणसिध्देश्वर मंदिरातून निघते. श्रावणातील शेवटच्या रविवारी रथाची मिरवणुक काढली जाते. शहरात बसवेश्वर जयंती उत्सव आणि अक्कमहादेवी जन्मोत्सव साजरे केले जातात. बसवेश्वर जयंतीस महात्मा बसवेश्वरांच्या मूर्तीची मिरवणुक काढली जाते. अक्कनबळगच्या (महिला संघटना) वतीने शहरात अक्कमहादेवीचा जन्मोत्सव साजरा केला जातो.

मरिआई, सटवाई, भैरोबा, म्हसोबा, खंडोबा, खोकलाई इत्यादी लोकदैवतांची मंदिरे शहरात आहेत. दर मंगळवारी, शुक्रवारी, अमावस्या व पोर्णिमेस या देवतांना लोक भजतात. कोंबड्या व बकऱ्याचा नैवद्य या देवतांना अर्पण करतात. शहरात पूर्व भागात साजरा होणारा तेलगु भाषिकांचा महत्त्वाचा उत्सव म्हणजे पोशम्मा उत्सव होय. हा उत्सव १५ दिवस चालतो. लोक पोशम्मा देवीस

पालेभाजी, दहीभात, नारळ आणि कोंबड्या, बकऱ्याचा नैवद्य अर्पण करतात. महाराष्ट्रातील मरिआई उत्सवासारखे आंध्रप्रदेशात पोशम्मा देवीच्या उत्सवास महत्त्व आहे.[७१]

सुमारे १४० वर्षांपूर्वी आंध्रप्रदेशातून मादगी समाज, उत्तरप्रदेशातून वाल्मिकी समाज आणि गुजरातमधून गुजराती परमार समाज हे सोलापूर शहरात येऊन बुधवार पेठेत स्थायिक झाले. सोलापूर नगरपालिकेच्या स्थापनेनंतर शहराच्या साफ-सफाईची जबाबदारी या तिन्ही समाजाने उचलली. नगरपालिकेने त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन सन १९५८ साली बुधवार पेठेत ५४ घरांची पक्की वस्ती बांधून दिली. सध्या या भागाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मादगी व वाल्मिकी नगर असे आहे. आंध्रातून आलेल्या 'मादगी' समाजाचे दैवत 'पोशम्मा देवी' हे असून आषाढ महिन्यात या देवीचा उत्सव साजरा होतो. उत्तर प्रदेशातून आलेल्या 'वाल्मिकी लालबिगी' समाजाचे श्रीरामाचे आणि जाहरवीर गोगाजींचे मंदिर या समाजाचे दैवत आहे. दरवर्षी गोकुळाष्टमीच्या दिवशी 'जाहरवीर गोगाजी' यांच्या जन्मोत्सवानिमित्त शहरात समाजाच्या वतीने मिरवणूक काढण्यात येते. शहरातील लष्कर, बेगम पेठ या परिसरातही काही प्रमाणात हा वाल्मिकी समाज राहतो. म्युन्सिपल कॉलनीत राहणारा 'गुजराती परमार समाज' हा शितलादेवीची आराधना करण्याबरोबरच गोकुळाष्टमी, नवरात्रोत्सव व गणेशोत्सव हे सार्वजनिक उत्सव साजरे करतात. गोकुळाष्टमीला या समाजात एक अनोखी प्रथा आहे. श्रावण महिन्यातील सप्तमी आणि अष्टमी या दिवशी या समाजात चूल पेटत नाही. या काळात दोन दिवसांपूर्वी बनविलेले शिळे अन्न खाल्ले जाते. सफाई कामगार वसाहतीत राहणाऱ्या या तिन्ही समाजाचे काम जरी एकसारखे असले तरीही हे लोक मराठी, तेलगु, हिंदी व गुजराती या चारही भाषेत एकमेकांशी संवाद साधतात. त्यामुळे याठिकाणी महाराष्ट्रासह, आंध्रप्रदेश, गुजरात आणि उत्तरप्रदेश या चार राज्यांचा सांसकृतिक संगम दिसून येतो.

सोलापूर शहरात इतर देवतांप्रमाणे नागोबाची काही मंदिरे आहेत. सोलापूर जिल्ह्यात मोहोळ आणि वडवळ या ठिकाणी नागेश संप्रदायाचा प्रसार झाला या संप्रदायाचा प्रभाव सोलापूर शहरावरही पडलेला आहे. रेवणसिध्देश्वर मंदिरात असणारे नागोबाचे छोटेखानी मंदिर, शहराच्या पश्चिमेकडे असलेले डोणगांव रस्त्यावरील नागोबाचे मंदिर ही मंदीरे महत्त्वाची आहेत. नागपंचमीस या मंदिरातून महिलांची गर्दी होते. घराघरामध्ये नागोबाचे चित्र काढून त्याची पूजा करतात. शहरातील महिला नागोबाची पारंपरिक गाणी म्हणून उत्सव साजरा करतात.

## ४.५.७ मुस्लिमांचे सण व उत्सव

मध्यकाळ आणि ब्रिटिश काळात शहरात विविध पेठांची स्थापना झाली. दक्षिणेतून आलेले मुस्लिम व्यापारी शहरातील बुवा कादरी मस्जिद, शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, विजापूर वेस, पाच्छा पेठ, शास्त्री नगर, मौलाली चौक, सिध्देश्वर पेठ, बारा इमाम चौक, पेंटर चौक या भागात स्थायिक झाले. त्यात मोमीन, विणकर, सगर, आळंद, धाराशिव, आवसे इत्यादी जाती व उपजातींचा समावेश होतो. हे लोक व्यापार व कारागिरी बरोबर आपले सण व उत्सव साजरे करू लागले. इस्लाममध्ये मोहरम, रमजान, बकरी ईद इत्यादी सणात चंद्राला विशेष महत्त्व असल्याने प्रत्येक महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेची चंद्रकोर (हिलाल) पवित्र मानली जाते. शुक्रवार हा दिवस पवित्र मानून या दिवशी मशिदीत नमाजाचे पठण केले जाते. महत्त्वाच्या पीरांचे, फकिरांचे स्मृति-उत्सवही साजरे करतात, त्यास उरूस ह्मणतात. मुस्लिम संताच्या समाधीला दर्गा म्हणतात. या दर्ग्याच्या ठिकाणी धुप, दिप लावून प्रार्थना म्हटल्या जातात.[७२]

- **मोहरम**

मोहरम हा मुसलमानी वर्षाचा पहिला महिना असून या महिन्याच्या पहिल्या दहा दिवसात 'मोहरम' हा सण साजरा केला जातो. या उत्सवात ताबुताला महत्त्व असते. इराकमध्ये 'करबला' या ठिकाणी हुसेन मारला गेला, तिथेच त्याची कबर बांधण्यात आली. त्या कबरीची प्रतिकृती तयार करून बसविली जाते, त्यास ताबुत (ताझिया) म्हणतात. एका भिंतीशी मक्केकडे तोंड करून ताबुताची स्थापना करून ताबुताशेजारी 'धीमजलीस' (शोकगीत) गाण्याचा कार्यक्रम होतो. शेवटी छातीवर हात मारून हसन-हुसेन यांच्या नावाचा आक्रोश केला जातो. हसन आणि हुसेन यांना मारल्यामुळे मुस्लिम लोक व्यथित होऊन सर्व सुखाचा त्याग करून व्रतस्थ होतात. कांही जण दिवसभर पाण्याचा थेंबही घेत नाहीत, उत्सवाच्या शेवटच्या दिवशी शहरातील सर्व ताबुतांची मिरवणूक काढली जाते., ताबुतांबरोबर चालणारे अनवानी लोक दुःखद प्रसंगाचे वर्णन करतात. शहरातील अनेक हिंदू बांधव या मिरवणुकीत सहभागी होऊन त्याची पूजा करून नवस बोलतात. काही हिंदू लोकांच्या अंगी पीराचा संचार होतो, ते दूल्हा-दूल्हा म्हणून नाचत असतात. सवारी म्हणजे एका लाकडी दांडक्यात चांदीचा नाल किंवा पंजा लावून त्यावर नवीन वस्त्र बांधले जाते. त्यालाही ताबुतासमोर नाचवितात, सवारीची मिरवणूक संपल्यानंतर सर्व ताबुत गावाबाहेर कब्रस्थान नेऊन पुरतात त्यानंतर श्रीमंत लोक गरीबांना कपडे, अन्न, द्रव्य दान करतात.[७३]

शहरात मोहरम सणापूर्वी दोन महिने ताजिया (ताबुत) तयार करण्यासाठी हजारो रूपये खर्च केले जातात. हा सण पवित्र असून जिकडे तिकडे पीरांच्या सवाऱ्या बसविल्या जातात. सन १९०२ मध्ये सोलापूर शहरात हिंदु-मुस्लिमांनी मोहरम सण मिळून साजरा केला होता. शहरामधील मौलालींची सवारी, मुसलमानांची सवारी, बडे अब्बासअलीची सवारी, अकबर कासिम यांची सवारी, तरवार पंजाची सवारी, विजापूर वेस, पीर बारा इमामची सवारी, दरवेशाचा पंजाची सवारी अशा प्रकारे अनेक सवाऱ्यांची मिरवणुक शहरातून काढली जाते.[७४]

शहरात १९० ठिकाणी पंजे बसविले जात. या पंजाच्या मिरवणुकीत गॅसबत्त्या, झुंबर, टेंबे, मशाली असत. मुस्लिम धर्मानुसार विविध धार्मिक विधी करून सवारीस प्रारंभ होत असे. मिरवणुकीत ढोल, ताशा, हलग्या, बॅण्ड पथक, जुन्या काळातील वाघ, मेळे इत्यादीद्वारे मिरवणुकीत हिंदु-मुस्लिमांसहित आशीकल मैदानामार्गे साखर पेठ विहिर, महिबुब सुबानी दर्गा, बुजुर्गअली, गुरूवार पेठ दर्गा, हाजीमाई चौक, नवी पेठ, दत्त चौक, माणिक चौक, विजापूर वेस आणि शेवटी बाराइमाम चौकात सवारीचा समारोप होत असे.[७५] मोहमद पैगंबरासमवेत काम करणाऱ्या बारा इमामाच्या नावे महापालिकेने १९६८ मध्ये या चौकाचे नामकरण बाराइमाम चौक असे केले. सर्व सवाऱ्या रात्रीच्या वेळी करबळीच्या ठिकाणी थंड होण्यास जातात. याच दिवशी सगळीकडे 'दुला दुला' हा आवाज ऐकू येतो. सवाऱ्या थंड होऊन परत आल्यावर रात्री १२ च्या सुमारास विजापूर वेशीत हाजुमाई व बारा इमाम यांच्या ताबुतांची भेट होते.[७६] शेवटी आसार मैदानावर सर्व ताबुत भेटीसाठी येतात. भक्तिचा हा सोहळा अनुभवण्यासाठी हिंदु-मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात. या सवारी बसविताना शहरातील अनेक हिंदु भाविक वर्गणी देतात [७७]

**रमजान (ईद - उल - फित्र)**

सोलापूर शहरात मोहरमप्रमाणे रमजान व बकरी ईद यासारखे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. 'ईद' हा अरबी शब्द असून याचा अर्थ अतिप्रसन्नता व अत्यानंद होय. नवनवीन कपडे घालणे, स्वादिष्ट पक्वान्न शिजविणे हे ईदचे बाह्यस्वरूप आहे. ईद आपल्याला संयम, समानता, सहानुभूती, करूणा, स्नेह, ममत्त्व आणि प्रेमाचा संदेश देते. रमजान हा मुस्लिम महिन्याचा नववा महिना असून या महिन्याच्या शेवटी मुस्लिम बांधव रमजानचा सण साजरा करतात. रमजान हा मुस्लिमांचा 'रोजे' करण्याचा महिना होय.[७८] या संपूर्ण महिन्यात दर दिवशी सुर्योदय ते सूर्यास्तापर्यंत

रोजा ठेवला जातो. रोजा हा इस्लामच्या पाच स्तंभापैकी एक महत्त्वाचा स्तंभ असून त्यामध्ये नमाज, रोजा, जकात, हज आणि कलमा इत्यादींचा समावेश होतो. धार्मिक वृत्तीचे मुसलमान या महिन्यातील काही दिवस मशिदीमध्ये घालवितात. रमजान हा पवित्र महिना मनुष्याला स्वतःच्या इंद्रियावर नियंत्रण ठेवण्याची शिक्षा देतो आणि मानवतेचा धर्म पाळण्याचा संदेश देतो. रमजानचे रोजे करणारा प्रत्येक जण आपल्याला वाईटापासून दूर ठेवून पावित्र्य पाळण्याचा प्रयत्न करतो. नमाजात एकाग्रता महत्त्वाची असून दिवसातून पाच वेळा नमाज अदा केला जातो. फजर, जोहर, मगरीब आणि इशा इत्यादी नावाने नमाज ओळखला जातो.[७९]

रमजानचा पूर्ण महिना रोजे ठेवल्यानंतर चंद्रदर्शन झाले की, रमजान ईद येते. चंद्रदर्शनावरच ईदचा दिवस अवलंबून असतो. या पवित्र महिन्याच्या अंतिम शुक्रवारनंतर शेवटच्या तारखेला ईदचा चंद्र दिसल्यानंतर आनंद व्यक्त करून ईदचा सण साजरा करतात.[८०] रमजान हा इस्लाम धर्मातील सर्वात महत्त्वाचा सण असून यालाच "ईद-उल-फित्र" असेही म्हणतात. हा सण साजरा करताना साधे परंतू स्वच्छ कपडे परिधान करून त्यावर अत्तर लावणे अनिवार्य असते. त्याद्वारे साधे जीवन जगण्याचा संदेश दिला जातो. सोलापूर शहरात हा सण मोठ्या प्रमाणावर साजारा होतो. "ईद-उल-फितर" हा अरबी शब्द असून 'ईद' या शब्दाचा अर्थ 'आनंद' आणि 'फितर' या शब्दाचा अर्थ 'दान' करणे होय. त्यामुळे या काळात अन्नदान आणि संपत्तीदान महत्त्वाचे मानले जाते. रमजानच्या महिन्यात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत नाश्ता अथवा जेवण करणे वर्ज्य आहे. मात्र ईदच्या दिवशी सकाळी नमाजापूर्वी नाश्ता म्हणून मिष्ठान्न खाल्ले जाते. तसेच अल्लाचे आभार व्यक्त करण्यासाठी ईदगाहमध्ये सामुहिक नमाज पठण होते.[८१] या दिवशी शहरातील मुस्लिम बांधव उत्तम पोशाख करून अलंकृत होऊन एकमेकांना आलिंगन देतात त्यामुळे या काळात शहरात सर्वत्र आनंदी वातावरण असते.

शहरातील रंगभवनजवळील अहले अलिश ईदगाह, जुनी मिल कंपौंडमधील ईदगाह, आसार मैदान ईदगाह, होटगी रस्त्यावरील नबी आलमगीर ईदगाह व पानगल प्रशालेतील शाही आलमगीर ईदगाह इत्यादी ईदगाह मैदानात रमजानच्या नमाजाचे पठण होते. याठिकाणी महिलांना नमाज अदा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केलली असते. या दिवशी शहर काझी अमजद अली, मौलाना अब्दुल सलाम रजवी, काझी शकिल हाजी शब्बीर, हुसेन मौलवी, मौलाना ताहेर बेग इत्यादी काझी व मुल्ला,

मौलवी खुत्बा सांगतात. ते एक प्रकारचा कौटुंबिक, सामाजिक आणि अध्यात्मिक कर्तव्याचा उपदेश करतात. नंतर सामुदायिक प्रार्थना होते. १५००० पासून ५०००० पर्यंत मुस्लिम बांधव प्रत्येक ईदगाहमध्ये सामुहिक नमाज अदा करतात.[८२] रमजान सणाच्या माध्यमातून एकमेकांना आलिंगन देऊन आनंद व्यक्त करण्यासोबत आपापसातील भांडणे, कलह विसरून एकोप्याने राहण्याचा संकल्प केला जातो. त्यामुळे सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण होते. सकाळची प्रार्थना झ ााल्यानंतर गोड आणि मिष्ठान्न पदार्थ तयार केले जातात त्यासाठी शेवयाची खीर, बदाम, काजू, पिस्ता, आक्रोड, विलायची, साखर, दूध, तुप इत्यादी पदार्थ वापरतात त्यास 'शिरखुर्मा' म्हणतात. यादिवशी हिंदू-मुस्लिम बांधव एकमेकांना भेटून 'ईद मुबारक' देतात.[८३]

मुस्लिम समाजात कोणीही गरीब राहू नये, सर्वांना दोन वेळचे जेवण मिळावे, यासाठी जकात सुरू करण्यात आली. ज्या व्यक्तीची आर्थिक स्थिती चांगली आहे, अशा व्यक्तीनी फितरा (दान धर्म) करणे अनिवार्य मानले जाते. घरात जेवढे सदस्य आहेत त्या प्रत्येक सदस्याने पावणे दोन किलो गहू आणि साडे तीन किलो खजूर किंवा साडे तीन किलो बेदाणे दान देणे बंधनकारक मानले जाते. हा फितरा रमजान ईदच्या नमाजापूर्वी दिला जातो, एवढेच नव्हे तर काही लोकांनी साडे सात तोळे सोने किंवा पन्नास तोळे चांदी व तेवढ्याच किंमतीच्या संपत्तीपेक्षा अधिक संपत्तीवर २.५% जकात (दान) देणे आवश्यक असते. रमजान सणातील या पध्दतीमुळे गरजूंच्या अडचणी सोडविल्या जातात आणि प्रत्येकाच्या घरी हा सण आनंदाने साजरा व्हावा हा उद्देश असतो.शहरात साजरा होणाऱ्या रमजान सणामध्ये मुस्लिम बांधव हिंदु बांधवांना सण साजरा करण्यासाठी आमंत्रण देतात, रमजान सणाच्या शुभेच्छा देतात. एकमेकांस आलिंगन देऊन घरी केलेले गोड आणि मिष्ठान्न जेवणाचे आमंत्रणही देतात. रमजानचे रोजे काही हिंदु धर्मियही ठेवतात. त्यामुळे हिंदू-मुस्लिमांमध्ये सलोखा टिकून राहण्यास मदत होते. यावरून असे दिसते की, मुस्लिमांच्या या रमजाण सणात हिंदुचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. माणूस माणसासाठी आहे व माणसाने माणसासाठी सहकार्याचा हात पुढे करावा, हा संदेश या सणाच्या माध्यमातून दिला जातो.

- **बकरी ईद**

बकरी ईद हा कुर्बानीचा सण म्हणून ओळखले जातो. हा सण इस्माईल जबीलल्ला आणि इब्राहिम खालील्ला यांची आठवण करून देणारा सण म्हणून ओळखला जातो.[८४] त्यांची आठवण

राहावी म्हणून शहरातील मुस्लिम लोक बकरी ईद सण साजरा करतात. या दिवशी सकाळी ईदगाहमध्ये नमाज पठण होते. बकरी अथवा बैलाचा बळी दिला जातो, त्याच्या मांसाचे तीन भाग करून, एक भाग स्वत:कडे, दुसरा नातेवाईकांना व तिसरा भाग गरीबांना दिला जातो. अशा प्रकारे शहरात हा सण साजरा केला जातो.[८५]

सन १९७४ मध्ये मुस्लिमांचा बकरी ईद, हिंदुचा गीताजयंती आणि ख्रिश्चनांचा नाताळ हे सण एकाच दिवशी आले होते. या तीनही धर्माचे सण एकत्र येण्याचा हा योग अत्यंत महत्त्वाचा होता. हे तीनही सण धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे असले तरी शहरातील हा धार्मिक त्रिवेणी सणांचा संगम उत्साहाने पार पडला.[८६]

महमंद पैगंबरांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने शहरातील विजापूर वेशीत विद्युत रोषणाई करण्यात येते. त्या दिवशी 'मशाई' (कविता), 'कशिदे' (परमेश्वराच्या स्तूतीपर कविता) आणि रात्री 'वाज' (प्रवचन) इत्यादी कार्यक्रम होतात. पैगंबरांच्या चरित्रावर आधारित भाषणे आणि कव्वालीचे कार्यक्रमही केले जातात. सन १९३७ मध्ये हैद्राबादचे मौलाना महमंद कासीम, अरबस्तानातील मौलाना शास्त्री साहेब, सोलापूरातील मुर्शद हबीबुल्ला साहेब यांचे 'वाज' (प्रवचन) झाले होते.[८७]

- **उरूस**

पैगंबरांचा जन्मदिवस व मृत्युदिन या महत्त्वाच्या सणाव्यतिरिक्त मुस्लिम बांधव विविध पीरांच्या व फकिरांचे स्मृती उत्सव साजरे करतात. मुस्लिम पीरांचा हिंदु समाजावर प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे पीरांच्या उरूसात अनेक हिंदुही सहभागी होतात. पीरांच्या उरूसाचे महत्त्व असल्याने शहरात तो ही उत्सव साजरा होतो, उरूसादिवशी त्यांच्या मजारवर फुलांची किंवा कपड्यांची चादर घालतात. पीरांच्या या समाधीला दर्गा म्हणतात. अशा दर्ग्याच्या ठिकाणी धूप दीप लावून प्रार्थना म्हटली  जाते व या काळात दर्गे विद्युत रोषणाई व फुलानीं सजवले जातात.

सोलापूर शहरात अनेक महत्त्वाचे दर्गे आहेत, त्यामध्ये हजरत हबशी मलिक अंबर, इकरार अली दर्गा, बंबईवाले बाबा, बशीर इनामदार दर्गा, सय्यद फकिर बाबांचा दर्गा, बाबा फकरोद्दिन शहा, हजरत पीर ऐतेकार अली शहा वली बाबा, हजरत मलंगशहा वली बाबा, हजरत सय्यद रसूल शहा वली बाबा, हजरत पीर पठाण शाहवली बाबा दर्गा, सय्यद बुखारी, गैबीपीर शहाजूर मुल्ला बाबा,

रहिम बाबा, अहमद अली शहा, बुजरू अली जावीद बाबा, हजरत शहाजहूर वली कादरी दर्गा, हजरत शहाजहूर नुरानी दर्गा, भैय्या चौकातील पीर जंग बहादूर सलावनखाँ बाबा दर्गा इत्यादिंचा समावेश होतो. या पीरांच्या उरूसात हिंदू-मुस्लिम भक्तीभावाने सामील होतात.[८८]

## ४.६ धार्मिक कार्यात महिलांचा सहभाग

सोलापूर शहरातील महिलांचा धार्मिक स्थळांशी जवळचा संबंध आहे. शहरात धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने वर्षभर अनेक कार्यक्रम होतात. मठ अथवा मंदिर या ठिकाणी होणाऱ्या भजन, प्रवचन, किर्तन आणि भारूड इत्यादी कार्यक्रमात महिला सहभागी होऊन प्रत्यक्षात त्यामध्ये रूची निर्माण करतात. भजन आणि किर्तनच्या माध्यमातून स्त्रियांनी धार्मिक विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. काही धार्मिक स्थळांच्या निर्मितीमध्ये महिला अग्रभागी आहेत. श्रीमती गंगुबाई सेवकराम परदेशी यांनी सन १९२० मध्ये शहरातील मेकॅनिक चौकात स्वतःच्या मालकीच्या जागेत दत्त मंदिराची निर्मिती केली. त्यांनी निर्माण केलेल्या या दत्त मंदिराची परंपरा पुढे महिलांनीच चालविली आहे. त्यांचे हे कार्य त्यांच्या कन्या कौशल्याबाई जवाहिरलाल कलवार यांनी पुढे चालविले. कलवार यांनी आपल्या आईकडून मिळालेल्या धार्मिक संस्कारामुळे सरस्वती चौकात सरस्वती मातेचे एक मंदिर बांधले. या मंदिराची स्थापना २ डिसेंबर १९४७ मध्ये करण्यात आली. या सरस्वती देवी मंदिरामुळे तेथे असणाऱ्या चौकाचे नामकरणही सरस्वती चौक असे करण्यात आले आहे. सध्या या मंदिराची देखभाल कलवार यांच्या चौथ्या पिढीतील महिला उषाकिरण आनंदनारायण कलवार या करीत आहेत.[८९]

शहरातील अनेक महिलांनी धार्मिक व अध्यात्मिक साहित्यातून आपला ठसा उमटविलेला आहे. यात सुमतीबाई शहा, विद्युलता शहा, जयदेवीताई लिगाडे, शशिकला मडकी, शुभांगी बुवा, डॉ. स्वर्णलता भिशीकर, अपर्णा कल्याणी, सुरेखा शहा, मयुरा शहा, इत्यादी महिलांचा समावेश होतो.

- **पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा**

सोलापूर शहरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या पंडिता सुमतीबाई शहा यांचा जन्म ९ जानेवारी १९१२ रोजी दिगंबर जैन घराण्यात झाला.[९०] त्यांना लहानपणापासूनच धार्मिकतेचे धडे मिळाले. आचार्य शांतीसागर महाराज आणि मुनी समंतभद्र

महाराज यांची मौलिक प्रेरणा सुमतीबाईंना लाभली.[११] मराठी, इंग्रजी, संस्कृत, हिंदी आणि गुजराती इत्यादी भाषांवर प्रभुत्त्व असणाऱ्या सुमतीबाईंनी वयाच्या १९ व्या वर्षी आचार्य श्री शांतीसागर महाराजांकडून ब्रह्मचर्य वृत्ताची दीक्षा घेतली होती. या ब्रह्मचर्य वृत्ताचा वसा त्यांनी जन्मभर पाळला. धार्मिकतेने, सचोटीने तिर्थयात्रा व चारीसंघांना दान देणाऱ्या सुमतीबाईंनी आपल्या धार्मिक कार्याची सुरूवात सन १९२३ मध्ये श्राविकाश्रमाची स्थापना करून केली. स्त्रियांना आधुनिक काळात शिक्षणाबरोबर धार्मिकतेचे ही धडे मिळावेत, ही यामागची प्रेरणा होती.[१२] धर्म ही श्रध्देची बाब असली तरी ते मनशांतीचे प्रभावी साधन आहे, हे विचार सुमतीबाईंच्या मनावर त्यांचे इंग्रजीचे शिक्षक पटवर्धन सरांनी बिंबवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच त्यांना धर्मग्रंथ वाचण्याची आवड निर्माण झाली. 'समाधीशतक' या ग्रंथातील अनेक श्लोक त्यांच्या मुखोद्गत होते.[१३] गिरनार सिध्द क्षेत्रावर दोन वर्षे राहून त्यांनी मौनवृत्त आचारून आत्मसाधना केली होती.

पंडिता सुमतीबाईंनी सोलापूर शहरात स्थापन केलेल्या श्राविकाश्रमाच्या माध्यमातून धार्मिक कार्याबरोबर फार मोठे सामाजिक कार्य केले. परित्यक्त्या, विधवा, अनाथ आणि निराधार महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिवणकाम, भरतकाम, टंकलेखन इत्यादी व्यावसायिक धडे दिले. एवढेच नव्हे तर त्यांना नैतिकतेचे आणि धार्मिकतेचे बळ दिले. यासाठी त्यांनी श्राविकाश्रमात 'भगवान महावीर' मंदिराची निर्मिती केली. या मंदिराच्या माध्यमातून महावीर पाठशाळा, श्राविका सांस्कृतिक केंद्र आणि ध्यान मंदिराचा प्रसार चालविला.[१४] याबरोबरच जैन धर्माचे तत्त्वज्ञान, आचार, विचार यांची समाजाला ओळख व्हावी, यासाठी त्यांनी प्रशिक्षण वर्ग चालविले.

अनेक संस्थांशी पंडिता सुमतीबाईंचा जवळचा संबंध होता. सन १९४६ साली कोल्हापूर येथे भरलेल्या "दक्षिण महाराष्ट्र जैन महिला परिषदे" च्या त्या अध्यक्षा होत्या. सन १९५६ मध्ये टोकिओ येथे भरलेल्या विश्वधर्म परिषदेत त्यांनी जैन धर्मावर व्याख्यान दिले. अमेरिकेतील जागतिक शाकाहार परिषदेत 'India Day' या दिवशी शाकाहार या विषयावर त्यांनी आपले मौलिक विचार मांडले होते. त्यावेळी त्यांनी भारतीय महिलांचे नेतृत्त्व करून भारतीय संस्कृती, धर्म आणि योग या विषयांचे महत्त्व जगाला पटवून दिले होते.[१५]

पंडिता सुमतीबाईंनी धार्मिक ग्रंथांचे लिखाण केले आहे. 'पुणार्ध्य' हा जैन वाङ्मयावरील ज्ञानकोष प्रसिध्द असून शिवाजी विद्यापीठाने तो पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ठेवलेला आहे. जैन

धर्मीय दृष्टीकोनातून लिहिलेले रामायण ज्ञानगीता, भावगीता, अमरभारती, समयसार, सुवर्णरेखा, आदिगीता, चामुंडराय करविले (बाहुबलीचे चरित्र), भावपल्लवी, षटखण्डागम, सुमती प्रज्ञा, सुमती वाणी हे गीत जीवनाचे आणि माझी जीवनगाथा इत्यादी २५ ग्रंथांचे लेखन व प्रकाशन केले आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना विदूषीरत्न, महिलारत्न व साहित्याचार्य अशा पदव्याने गौरविले. १९ एप्रिल १९७० रोजी भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते 'पद्मश्री' हा किताब बहाल करून सन्मानित केले. ७ जुलै २००० या दिवशी 'सल्लेखना' पध्दतीने त्या स्वर्गवाशी झाल्या.[९६]

- **विद्युलता शहा**

श्राविका संस्थेच्या माध्यमातून सुमतीबाई नंतर धार्मिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या विद्युलता शहा यांचे कार्य महत्त्वाचे आहे. विद्युलता शहा या पंडिता सुमतीबाईंच्या विश्वासू सहकारी आहेत. आपल्या आईकडून धार्मिकतेचे धडे मिळालेल्या विद्युलता यांनी आचार्य शांतीसागर महाराजांकडून ब्रह्मचर्य वृत्ताची दीक्षा घेतली. श्राविका संस्थेच्या भरभराटीत त्यांचा फार मोलाचा वाटा आहे. श्राविकाश्रमात असलेल्या भगवान महावीर मंदिराची व त्या माध्यमातून होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाची जबाबदारीही विद्युलता यांच्यावर आहे. मंदिरातून होणारे धार्मिक कार्यक्रम, विधी आणि उत्सव त्या आनंदाने पार पाडत आहेत. श्राविकाश्रमाला भेट देणाऱ्या मूनींची सेवा मनोभावे करतात. विद्युलता शहा यांनी सुमतीबाईबरोबरच 'पुर्णार्ध्य' या ग्रंथाचे प्रकाशन व 'जिनसहस्त्रनाम भगवान महावीर संस्कृत परिचय' या ग्रंथाचे लिखान केले. त्यांना महाराष्ट्र सरकारने सन २००४ मध्ये 'कवि कालिदास संस्कृत साधना' पुरस्कार व भारत गौरव आचार्य रत्न देशभूषण पुरस्कार समिती दिल्ली या संस्थेकडूनही सन २००४ मध्ये 'धर्मचंद्रिका' पुरस्कार देऊन गौरविले.[९७]

- **जयदेवीताई लिगाडे**

महाराष्ट्र व कर्नाटकात धार्मिक व सामाजिक कार्याने अमर झालेल्या जयदेवीताई लिगाडे यांचा जन्म २३ जून १९१२ रोजी सोलापूर शहरात 'इंद्रभुवन' या ठिकाणी झाला. जयदेवीताई शिवभक्त होत्या. त्या आपले रोजचे दोन तास शिवलिंगपूजेत घालवित. त्यांचे आराध्यदैवत श्री सिध्देश्वर असल्याने दररोज सिध्देश्वरांचे दर्शन घेत व दर सोमवारी त्या मौनव्रत आचरत.

जयदेवीताईंच्या मनावर वीरशैव धर्माचा पगडा होता. बसवराज देवरगळे, प्रभुलिंग लेले, सिध्दाराम चरित्र अशा विविध धर्मग्रंथांचे त्या वाचन करीत. गौर वर्ण, कांतीयुक्त डोळे, कपाळावर भस्म, हातात व गळयात रूद्राक्षाच्या माळा, खादीची पांढरी शुभ्र साडी असा त्यांचा वेश होता.

सन १९३८ मध्ये हुबळी येथे भरलेल्या अखिल भारतीय वीरशैव महासभेच्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. मराठी भाषेतून त्यांचे शिक्षण होऊनही कन्नड भाषेवर त्यांचे प्रभुत्त्व होते. सन १९५० मध्ये मुंबई येथे संपन्न झालेल्या कन्नड साहित्य संमेलनात महिला चर्चासत्राच्या त्या अध्यक्षा होत्या.[९८] ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांनी गायलेल्या 'येळय्या येळय्या येळय्या सिध्दरामा' या कन्नड भूपाळीची रचना जयदेवीताईंनी केलेली आहे, त्यांनी लिहिलेले २५ ग्रंथ प्रसिध्द असून त्यामध्ये महावीर राणी, जयगीत, सिध्दलिंगवाणी (सिध्दरामेश्वर वचनाचा मराठी अनुवाद), महायोगिनी (अक्कमहादेवी वचनाचा मराठी अनुवाद), सिध्दरामाची श्रीविधी, तारक तंबूरी, बसव दर्शन आणि सिध्देश्वर पुराण इत्यादींचा समावेश होतो. 'सिध्देश्वरपुराण' या काव्य रचनेतून वीरशैव धर्माचे अंग, प्राण, आत्मा, अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थळांचे सौंदर्य पाहावयास मिळते. हे काव्य त्यांनी त्रिपदी छंदस्यू (तीन पदांच्या ओवीमध्ये) लिहिले आहे. या रचनेसाठी त्यांना धारवाड विद्यापीठाने 'डॉक्टरेट' पदवी देऊन सन्मानित केले. जयदेवीताईंनी महाराष्ट्र आणि कर्नाटकात अनेक ठिकाणी 'अक्कनबळग' ची स्थापना केली. काटेकोरपणे धर्माचरण पाळणाऱ्या जयदेवीताईंनी आपले उर्वरीत आयुष्य बसवकल्याण येथे घालविले. याच ठिकाणी २५ जुलै १९८६ रोजी त्या लिंगैक्य झाल्या.[९९]

वीरशैव धर्माचा प्रचार आणि प्रसार त्यांनी आपल्या कार्यातून आयुष्यभर केला. त्यांच्या कार्याचा वारसा त्यांच्या ज्येष्ठ कन्या शशिकला मडकी यांनी चालविला. त्यांनीही मराठी व कन्नड भाषेत २७ धर्मग्रंथांची निर्मिती केली. "परमपुज्य महातपस्वी श्रीकुमार स्वामीजींचे जीवन आणि साहित्य" या त्यांच्या मराठी भाषेतील ग्रंथाचा हिंदीमध्ये अनुवाद करण्यात आला आहे. "श्री सिध्दरामेश्वर वचनसुधा" या त्यांच्या ग्रंथास महाराष्ट्र प्रदेश बसव समिती, मुंबई या संस्थेने पुरस्कृत केले आहे. सोलापूर शहरात असणाऱ्या "प्रार्थना योग महिला मंडळ, सोलापूर" या संस्थेच्या त्या संस्थापक अध्यक्षा आहेत तसेच त्या उत्कृष्ट गायिका आणि कवयत्रीही आहेत.[१००]

सोलापूर शहरात विविध धर्मिय व पंथीयांची धार्मिक स्थळे मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा धार्मिक स्थळांच्या माध्यमातून एकादशी, कृष्ण जन्माष्टमी, राम नवमी, दत्त जयंती, गुरू पोर्णिमा,

श्रावणातील सण, चातुर्मास इत्यादी प्रसंगी शहरातील अनेक महिला किर्तन, भारूड, व्याख्याने, प्रवचनाद्वारे लोकजागृतीचे कार्य करताना दिसून येतात. शहरातील दक्षिण सदर बझार येथील दत्त मंदिरात ह. भ. प. हणुमंत बोळकवठेकर गुरूजी हे मुली आणि महिलांना भगवत्गीतेचे पाठ शिकवित. त्यांनी जवळ जवळ एक हजार मुलींना व स्त्रियांना भगवत्गीता शिकविली. यातूनच रंजना क्षिरसागर या अंध मुलीने संपूर्ण गीता तोंडपाठ करून ती इतरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले.[१०१] रत्नप्रभाताई सहस्त्रबुध्दे या महिलांना भजन, किर्तन, भारूड, गीता इत्यादींचे प्रशिक्षण देतात. त्यांच्या किर्तनात धर्म, रूग्णसेवा, एडस् जागृती, स्वातंत्र्य सैनिक असे विषय असतात.[१०२]

शहरात अनेक महिला भजनी मंडळे असून धार्मिक स्थळांच्या प्रभावाने ही मंडळी लोकजागृतीचे कार्य करताना दिसून येतात.[१०३] शहरातील विविध महिला भजनी मंडळे कवी शुभराय मठात आषाढी व कार्तिकी एकादशीला एकत्र येऊन भजन, किर्तनाचा कार्यक्रम करतात.[१०४] शुभराय मठाच्या माध्यमातून शुभांगी बुवा यांनी ८ मे २००३ रोजी 'पाखर संकुल' या नावाने सोलापूर शहरात दत्तक विधानासाठी काम करणाऱ्या संस्थेची उभारणी केली.[१०५] धार्मिक स्थळाच्या माध्यमातून शुभांगी बुवा समाजकारणाचे धडे गिरवताना दिसून येतात. दंडवते महाराज गुहा (मठ) या ठिकाणी लहानपणापासून कार्य करणाऱ्या श्रीमती ताराबाई चिंचोळकर यांनी अभंगाची रचना केली असून दंडवते महाराजांच्या जीवन चरित्रावर त्यांनी अनेक किर्तनेही केलेली आहेत. दंडवते मठाच्या निर्मितीपासून सेवेत असणाऱ्या श्रीमती मंगलाबाई दिगंबर शेटे त्याचबरोबर गोविंद महाराज यांच्या पत्नी रूक्मिणीबाई यांनी वकील असूनही धार्मिक कार्याला वाहून घेतले आहे.[१०६]

एकविसाव्या शतकात महिलांनी सर्वच क्षेत्रात आपल्या कामगिरीचा ठसा उमटविलेला आहे. सोलापूर शहरात पुरोहित म्हणून कार्य करणाऱ्या आणि समाजातील महिलांना ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून पौराहिताचे प्रशिक्षण देणाऱ्या डॉ. स्वर्णलता भिशीकर या सोलापूरातील पहिल्या महिला पुरोहित म्हणून ओळखल्या जातात. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरही महिलांना पौराहित्याचे प्रशिक्षण देण्याचे काम त्या करीत आहेत. त्यांच्या या कार्यात अपर्णा कल्याणी, मेघना फडके, गायत्री सेवक, प्रज्ञा जेरे इत्यादी महिला सहकार्य करीत आहेत.[१०७] डॉ. स्वर्णलता यांचे कार्य सोलापूर शहरापुरते मर्यादित राहिले नाही तर त्यांनी ४५ महिलांच्या पथकासहीत राजस्थानात जावून १० दिवस विविध शहरात किर्तनाच्या माध्यमातून सतीविरोधी आवाज उठविला होता. अमेरिकेत "मराठी संस्कृती व

सण" या विषयावर दोन दिवसीय अधिवेशनात त्यांनी याच विषयावर आपले विचार मांडले.[१०८] अपर्णा कल्याणी यांनी 'अशी करा भगवती आराधना' या धार्मिक ग्रंथाचे लेखन व 'श्रीदुर्गासप्तशती' मधील श्लोकांचे परिच्छेद व अर्थासह संकलन व संपादन केले आहे. त्यांच्या पौराहित्य शिबीरामध्ये विविध जाती-धर्मांतील स्त्रियांबरोबर पुरूषांचाही सहभाग असतो.[१०९]

अलिकडील काळात महिला अत्याचारात वाढ झालेली दिसून येते, महिलांवरील अत्याचार कमी व्हावेत, म्हणून सन २०१३ या वर्षाच्या पहिल्या दिवशी शहरातील हिंदु आणि मुस्लिम समाजातील महिलांनी एकत्र येऊन सिध्देश्वर मंदिर आणि शहाजहूरवली दर्ग्यात सामुहिक प्रार्थना केली. यावेळी शहाजहूर वली दर्ग्यात हिंदु स्त्रियांनी 'वजू' करून इस्लामी पध्दतीने प्रार्थना केल्याचा उल्लेख सापडतो. यातून महिलांच्या बाबतीतही सोलापूर शहरातून राष्ट्रीय एकतेचा संदेश समाजाला दिल्याचे दिसून येते.[११०]

जात्यावर गायील्या जाणाऱ्या ओव्या, सण, उत्सवाची गीते, न्हानावळी, डोहाळे आणि बारसे इत्यादी वेळी गायलेली स्त्रीगीते यामधून समजाचे दर्शन होते. पहाटे उठून जात्यावर दळण दळताना गाणे म्हणणारी स्त्री आज जरी दिसून येत नसली तरी दळण, कांडण, सडा-सारवण, बाळाची अंगाई गीते इत्यादी गाणी ओवीबध्द आहेत.[१११]

सोलापूर हे जरी शहर असले तरी ग्रामीण भागातून शहरात जीवन जगण्यासाठी आलेल्या लोकांचा फार मोठा भरणा आहे. त्यामुळे या शहराची ग्रामीण जीवनाशी नाळ जोडलेली आहे. सणवार, जत्रा, लग्नकार्य इत्यादींची वर्णने लोकगीतातून पाहावयास मिळतात. बैलपोळा, अक्षय तृतिया, खंडोबाची यात्रा, पंढरीची वारी, धनगरी गीते, गोंधळी गीते इत्यादी गाणी ओव्यातून दिसून येतात.[११२]

सोलापूर शहराचा ग्रामीण जीवनाशी घनिष्ठ संबंध असल्याने शहरातील अनेक महिलांनी स्त्रीगीतांची व लोकगीतांची परंपरा जतन करून ठेवली आहे. वारकरी पंथाचा प्रभावामुळे महिलांनी विठ्ठलाविषयीची गाण्याची रचनाही केल्याचे दिसून येते. लक्ष्मीबाई शिवलिंग व्हटकर यांनी लोकगीतांचा संग्रह निर्माण करून सामाजिक व धार्मिक चळवळीस चालना दिली. त्या विठ्ठलभक्त असल्याने विठ्ठल व एकादशी याविषयी त्यांनी काव्य रचना केलेली आहे. त्यांच्या काव्यातील काही पंक्ती खालीलप्रमाणे आहेत.

विना आई बापाची नार जन्मली अशी
ब्रह्मा-विष्णुने नाव ठेविले तुझ एकादशी
एकादशी बाई तुझा निर्मल धंदा
नेणता राणू माझा हरी गुंतला तुझ्या छंदा ।। १ ।।
एकादश बाई नाव तुझं रंभा ।
विठ्ठलाच्या फराळीला खडी साखर पिवळा अंबा ।।
एकादश बाई नाव तुझं सरस ।
केळीच्या पानावर देव सोडीतो बारस ।। २ ।।

अशा प्रकारची पांडुरंगाची भक्तीची अनेक गीते लक्ष्मीबाई यांनी रचलेली आहेत.[११३] शहराच्या पूर्व भागात विड्या वळणाऱ्या पद्मशाली समाजाच्या स्त्रिया आपल्या कामाचा शीण घालविण्यासाठी हाताने विड्या वळताना ओठातून तेलगु भाषेतील सुंदर स्त्रीगीते म्हणताना दिसून येतात. यातून या महिलांनी सोलापूर शहरात राहून आपली तेलगु संस्कृती टिकवून ठेवल्याचे दिसून येते.

## ४.७ धार्मिक स्थळांचा आर्थिक प्रभाव

प्राचीन काळापासून धार्मिक स्थळांना सामाजिक व आर्थिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान राहिले आहे. धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने न्यायनिवाडे, धार्मिक उत्सव होत असत. तसेच राजेरजवाड्यांकडून धार्मिक स्थळांना गांवे, जमिनी, रोख रक्कम किंवा वस्तूच्या स्वरूपात इनामे किंवा दाने दिली जात. अशा दानातून धार्मिक स्थळांची देखभाल होत असे. राजेरजवाडे यांनी दिलेली दाने जनतेला माहिती व्हावीत, म्हणून ती शिलालेखाच्या माध्यमातून कोरली जात. शिलालेख हे कधीही नष्ट न होणारे इतिहासाचे साधन असल्याने या शिलालेखावरून दिलेली दाने कोणत्या राजाने, कोणाला, केंव्हा व कोणत्या स्वरूपात दिली याची माहिती आपणांस मिळते.

बाराव्या शतकात सोलापूरचे थोर संत व वीरशैव शिवशरण श्री सिध्दारामेश्वर यांनी तत्कालीन सोन्नलिगे ग्रामामध्ये श्रीशैल मल्लिकार्जून देवाचे एक मंदिर उभारले व त्यास 'कपिलसिध्द मल्लिकार्जून' असे नांव दिले.[११४] सन १८१९ साली किल्ल्यातील उत्खननात दोन खंडित शिलालेख सापडले.[११५] या शिलालेखातील मजकूरावरून मंदिराच्या देखभालीसाठी आणि चालविण्यात येणाऱ्या अन्नछत्रासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी कांही गांवे व त्या गांवातील धान्य मंदिरासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे. अनेक ठिकाणाची व भिन्न भिन्न वृत्ती व्यवसायाची बरीच प्रतिष्ठित माणसे एकत्र जमून

सोन्नलिगे कपिलसिध्द मल्लिकार्जूनास अणदूर विभागातील ३०० गावातून प्रत्येक घरामागे पायली धान्य गोळा करून व काही जिन्नस दान रूपाने दिल्याचा उल्लेख या दोन खंडित शिलालेखात सापडतो. या धान्याचा विनियोग कपिलसिध्द मल्लिकार्जून मंदिरात चालणाऱ्या अन्नदानासाठी केला जात असावा असे वाटते. यावरून मिळालेल्या दानातून बाराव्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणावर अन्नदान करण्याची पध्दती होती. संबंधित पुराव्यावरून अन्नछत्र चालविण्याची ही पध्दत सिध्दरामेश्वरांच्या काळापासून असल्याचे दिसते.[११६] मंदिराच्या योगक्षेमासाठी ग्रामदान-भूदान आणि द्रव्यदान आदी अनेक तऱ्हेची दाने कोरीव लेखातून दिसून येतात. परंतु एखाद्या राजकीय विभागातून घरटी पायली धान्य गोळा करून मंदिरास अर्पण करणे, असाही दानाचा प्रकार त्या काळात चालत होता हे यावरून सिध्द होते.

श्रीसिध्दरामेश्वर देवस्थानास पेशव्यांच्या काळात नैवेद्य, पुजा-अर्चा, नंदादीप व यात्रेकरीता काही रक्कम मिळे. ब्रिटिश सरकारकडून सिध्देश्वराच्या गड्डा यात्रेकरीता दरवर्षी २५० रूपये, नंदादीपाकरीता २०१ रूपये व श्रावण रूद्राभिषेकाकरीता श्रीधर माधव माळगी यास १५ रूपये, ब्राह्मण पंच यास ७१ रूपये आणि श्री गवई यांना ही काही रक्कम दिली जाई.[११७] ही प्रथा आजतागायत चालू आहे. प्रतिवर्षी नक्त नेमणूकी रक्कम २०१ रूपये मे. तहसिलदार उत्तर सोलापूर यांचेमार्फत सिध्देश्वर देवस्थानास दिली जाते.[११८] मंदिराबरोबर पेशव्यांच्या काळात मठांनाही देणग्या दिल्या जात असत. पेशवाईत कवि शुभराय यांनी आपल्या मठास मिळालेली आर्थिक मदत गोर-गरीबांना वाटल्याचा उल्लेख आहे.[११९]

भूईकोट किल्ल्याच्या बांधकामाच्या वेळी जोतिष्याच्या सांगण्यावरून बुरूजाखाली पद्मावती नावाची एक स्त्री बळी दिली. ही स्त्री दर्गो-पाटील घराण्यातील असल्याने सोलापूरच्या पाटीलकीचे वतन दर्गो-पाटील घराण्याला वंशपरंपरेने दिले गेले. पद्मावतीच्या नावाने एक छोटे मंदिरही किल्ल्यात उभारण्यात आले.[१२०] किल्ल्याच्या आत असणाऱ्या तिसऱ्या प्रवेशद्वाराजवळील बुरूजाखाली एका बालकाचा बळी देण्यात आला.[१२१] हा बालक सोलापूरचे प्रसिध्द शाहिर, किर्तनकार व लावणीकार कविराय रामजोशी यांच्या पूर्वापिढीतील असल्याचे सांगितले जाते. याबद्दल रामजोशी घराण्याकडे जोशीपणची वृत्ती देण्यात आली होती. तसेच सरकारातून १५ रूपयांची दरसाल नेमणूक करून दिली होती, ती आजतागायत रामजोशी घराण्याकडे आहे. या

बालकाच्या नावे किल्ल्याच्या तिसऱ्या प्रवेशद्वाराजवळ 'महांकाळेश्वराचे' छोटेखानी मंदिर पाहावयास मिळते. या मंदिराची पुजा-अर्चा याच जोशी घराण्याकडे आहे.[१२२] रामजोशी यांचे वडील जगन्नाथपंत जोशी यांना कुटुंबाच्या योगक्षमासाठी श्रीमंत बाळाजी बाजीराव यांनी सन १७५८ मध्ये सोलापूर येथे २० बिघे जमिन बक्षिस म्हणून दिल्याची नोंद आहे.[१२३] तसेच कविराय रामजोशी यांनाही दुसऱ्या बाजीरावाने स्वहस्ते गोकुळाष्टमीस पुणे येथील शुक्रवार वाड्यात कथा केली म्हणून १०० रूपये दक्षिणा दिल्याचा उल्लेख मिळतो.[१२४]

मोगल बादशहा औरंगजेबाचा सोलापूर शहराशी आलेला संबंध हा सोलापूरच्या धार्मिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. ब्रह्मपूरी येथे छावणी असताना औरंगजेब अनेक वेळा सोलापूरातील जामा मशिदीत नमाज पडण्यासाठी येत असे. त्यावेळी त्याच्याबरोबर अनेक मुस्लिम बांधवही आले होते. तेव्हां त्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी यासाठी औरंगजेबाने शहरात पाच्छा पेठ व बेगम पेठ या दोन पेठांची निर्मिती केली.[१२५] सन १६९२ मध्ये सोलापूरात ईदचा नमाज अदा करण्यासाठी औरंगजेबाने 'आलमगीर ईदगाह'चे बांधकाम करविले. आज आपणांस हा ईदगाह शहरातील पानगल हायस्कुलच्या मैदानात पाहावयास मिळतो.[१२६] सिध्देश्वर तलावाला लागून असलेल्या हजरत शहाजहूरवली दर्ग्याच्या प्रवेशद्वारावरील नगारखानाही औरंगजेबाने बादशहाने बांधून दिल्याचा उल्लेख आहे. तसेच या दर्ग्यास त्याने जमिनही दान दिली होती.[१२७] विजापूरच्या आदिलशहाने सोलापूर नजीक असणाऱ्या होटगी येथील पीर हाजी फराद्योद्यीन चिश्ती या प्रसिध्द दर्ग्याच्या उत्सवाकरीता जमीन दान दिल्याचीही माहिती मिळते.[१२८]

शहरातील व्यापाऱ्यांकडून 'देवस्थान धर्मादाय' नावाचा कर वसूल केला जाई. त्यावेळचे पुढारी मल्लेशप्पा वीरप्पा जम्मा हे शहरातील काही व्यापाऱ्यांच्या अनुमतीने हा कर वसूल करत. परंतु जरूर पडेल तेंव्हा देवस्थानप्रित्यर्थ, देवालय, घाट, तलाव, अन्नछत्र इत्यादींकरीता स्वखुशीने काही लोक खर्च करीत. शहरातील दानशूर व्यक्ती श्रीमंत धर्मराव थोबडे यांनी बाळीवेशीतील श्रीमल्लिकार्जूनाचे मंदिर स्वखर्चाने बांधले. सिध्देश्वर मंदिरातील संमती कट्ट्याच्या दक्षिणेकडील चिरेबंदी कमानीचे बांधकामही त्यांनी स्वखर्चाने केले. श्री कोडगी व श्री बसवंती या दोघांनी दुकानाच्या मिळणाऱ्या देवस्थान धर्मादायकराच्या आधारे सिध्देश्वर मंदिराचे महाद्वार बांधले. सिध्देश्वर तलावाच्या काठी असलेले एकनाथाचे देऊळ व त्यामागील घाट बाबुराव चिट्टे यांनी

जोडभावी पेठेतील व्यापाऱ्यांकडून बांधून घेतले. आप्पाराव निराळी व बाबुराव निराळी यांनी आदलिंगी धर्मशाळा बांधून घेतली. सन १९०७ मध्ये आप्पासाहेब वारद यांनी वीरशैव महासभा अधिवेशनाच्या निमित्ताने स्वखर्चाने सिध्देश्वर मंदिरासमोरील भव्य सभामंडपाचे काम केले. वीरशैव महासभेचे तिसरे अधिवेशन त्याच वर्षी या मंडपात भरविण्यात आले होते. हा सभामंडप मंदिराच्या समोर असणारा तलाव हटवून बांधल्याचा उल्लेख आहे.[१२९]

शहरात भरणाऱ्या गड्डा यात्रेच्या आणि विविध उत्सवांच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते.[१३०] सोलापूर ही एक मोठी बाजारपेठ बनण्याचे गड्डा यात्रा हे एक महत्त्वाचे माध्यम होते. या यात्रेत वेगवेगळी दुकाने थाटली जातात. या दुकानांच्या माध्यमातून सिध्देश्वर पंचकमिटीला दरवर्षी कराच्या स्वरूपात लाखो रूपये मिळतात. या यात्रेत धान्यांचे, कपड्यांचे व जनावरांचे बाजार भरतात. रेवणसिध्देश्वर मंदिराच्या समोरील मैदानात गड्डा यात्रेच्या निमित्ताने जनावरांचा फार मोठा बाजार भरतो, या बाजारात लाखों रूपयांची उलाढाल होते. यात्रेच्या निमित्ताने सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीमार्फत विविध प्रदर्शने भरविली जातात.[१३१] यात्रेचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे शोभेची दारू उडविणे हे आहे. पूर्वी हे दारूकाम पाहण्यासाठी प्रौढास चार आणे व मुलांना दोन आणे तिकीट असे. त्यामुळेही सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीस मोठ्या प्रमाणावर अर्थप्राप्ती होत असे.[१३२] मात्र अलिकडील ४० वर्षांच्या काळात ही पध्दत बंद करण्यात आली आहे.

आषाढ आणि श्रावण महिन्यात शहरात अनेक उत्सव साजरे केले जातात. यावेळी शहरात पूजेच्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. जानेवारी महिन्यात संक्रांती सणाला तिळगुळाची विक्री होते तर सिध्देश्वरांच्या यात्रेच्या वेळी महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकातून आलेले भाविक श्री सिध्देश्वरास नारळ वाहतात. या नारळाच्या माध्यमातून व्यापारी वर्गास फार मोठी अर्थप्राप्ती होते. सन १९४२ च्या श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी शहरात सुमारे तीस हजार नारळाची विक्री झाल्याची नोंद आहे. चार पैशास मिळणारा नारळ त्यावेळी नऊ पैशास झाला होता. अशा प्रकारची नारळाची विक्री सन १९४२ पूर्वी कधीही झाली नव्हती.[१३३] आषाढ आणि श्रावण महिन्यात विविध धार्मिक उत्सवामुळे सन २०१२ मध्ये १ लाख नारळ विकले गेले होते.[१३४]

शहरात गणेशोत्सव काळात २०० ते ३०० गणेश मंडळे गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना करतात. नवरात्रात रूपाभवानी मातेची यात्रा १५ ते २० दिवस चालते. रमजानच्या काळात भरविण्यात येणारा

'मीना बाजार' एक महिना असतो. रमजानचे रोजे सोडण्यासाठी लागणारी खजूर इराक, इराण, सौदी अरेबिया इत्यादी देशातून आयात केली जाते. मुंबईहून विविध शहरात खजूर पाठविली जाते.[१३५] अशा विविध धार्मिक उत्सवाच्या काळात लोक मोठ्या प्रमाणात अनेक प्रकारच्या वस्तू खरेदी-विक्री करतात त्यामुळे शहरात मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते.

धार्मिक स्थळांमुळे लोकसंग्रह, लोकशिक्षण, सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य, धार्मिक ऐक्य, आचार-विचार व सांस्कृतिक ऐक्य मोठ्या प्रमाणावर घडून येते. शहरात असणाऱ्या धार्मिक स्थळांच्या उत्सवासच्या प्रसंगी विशिष्ट अशा धर्माचे लोक असत नाहीत तर अशा प्रसंगी सर्वधर्मिय त्यामध्ये सहभागी होतात. यातून आचार-विचारांची देवाण-घेवाण होण्यास मदत होते. देव-देवतांच्या उत्सवाच्या प्रसंगी मिरवणूका काढल्या जातात. यावेळी विविध चित्तथरारक खेळ, मल्लखांब, काठी फिरविणे, मशाल प्रदर्शन, लेझिम, उड्या इत्यादींचे प्रदर्शन केले जाते. विविध वेशभूषेतील विद्यार्थी यामध्ये भाग घेऊन लेझिम, ढोल, ताशा, विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम व कवायतीचे प्रकार सादर करतात. अलिकडील काळात पर्यावरण, मुली वाचवा, पाणी वाचवा, व्यसनमुक्ती, स्त्री अत्याचार, एड्स जनजागृती, अपघात नियंत्रण, वाहतूक नियम, अंधश्रध्दा निर्मूलन, लोकसंख्या नियंत्रण इत्यादी विविध विषयांचा समावेश झाल्याने सर्वांगीण अभिसरण घडून येण्यास मदत झाली आहे.

धार्मिक स्थळे ही लोकशिक्षण आणि लोकसंग्रहाची महत्त्वाची ठिकाणे असल्याने प्रवचन, किर्तन, भारूड, भजन, व्याख्यान, कव्वाली याद्वारे फार मोठ्या प्रमाणावर समाज प्रबोधन घडवून आणले जाते. जसजसा काळ बदलत आहे त्यानुसार या विचारांचे अभिसरण घडून येताना दिसून येते. वरील माध्यमांच्याद्वारे अलिकडच्या काळात सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक विचारांची देवाण-घेवाण होऊन माणसांच्या जीवनामध्ये अभिसरणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर घडून आली आहे. सामाजिक अभिसरण प्रक्रियेमुळे विविध ठिकाणी स्त्रियांचा सहभाग वाढलेला दिसून येतो. शिक्षण, राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण अशा विविध क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येऊ लागला आहे. विचारांच्या या अभिसरणामुळे व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत झाली.

विविध धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने होणाऱ्या यात्रा व उत्सवामध्ये काळानुसार आर्थिक अभिसरण झालेले दिसून येते. शहरात भरणाऱ्या गड्डा यात्रा उत्सवाप्रसंगी विविध देव-देवतांच्या

उत्सवाप्रसंगी विविध प्रदर्शने भरवून त्यामध्ये लोकांचा सहभाग वाढवला जातो. या प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकांना नवनवीन वस्तूंचे ज्ञान, नवीन यंत्रांची माहिती होऊ लागली. शेतकी प्रदर्शनाद्वारे पारंपारिक पध्दतीच्या शेती अवजारांच्या ऐवजी आधुनिक पध्दतीची अवजारे, पिकांच्या विविध जाती, विविध संकरित बी-बियाणे, पिक किड नियंत्रण औषधे इत्यादींचा त्यात समावेश होतो. त्याचबरोबर या यात्रेत जनावरांचेही प्रदर्शन भरवून चांगल्या प्रतीच्या जनावरांचे नंबर काढून त्यांना बक्षिसे दिली जातात. यातून आर्थिक अभिसरण होण्यास मदत होत आहे.

सोलापूर शहरात असणाऱ्या धार्मिक स्थळांचा मानवी जीवनावर फार मोठा प्रभाव पडल्याने सर्व धर्मीयांचे लोक उत्सवाप्रसंगी एकत्रित येऊन राष्ट्रीय ऐक्याचे प्रदर्शन घडवितात. हिंदुच्या सण-उत्सवामध्ये मुस्लिम बांधवांचा सहभाग, मुस्लिमांच्या सण आणि उत्सवामध्ये हिंदुचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग, हिंदु, मुस्लिम, लिंगायत सहभोजनाचे कार्यक्रम इत्यादीद्वारे सामाजिक व सांस्कृतिक एकोप्याबरोबरच राष्ट्रीय ऐक्य टिकून राहण्यासही मदत झाली आहे.

## संदर्भ व तळटिपा


१. शर्मा रामशरण, प्राचीन भारताचा परिचय (अनु.), बिंदा परांजपे, २००४, पृ. २-४.

२. चिटणिस के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग-२, समाज व संस्कृती, पृ. १७१.

३. दिक्षीत दुर्गा (संपा.), डायमंड मराठी संस्कृती कोश, २००९, पृ. ९९.

४. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, २००६, पृ. २१६ - २१७.

५. कल्पतरू (साप्ताहिक), सोलापूर, १३ डिसेंबर, १८६८.

६. कुलकर्णी गणेश पंढरीनाथ, शतसवंत्सरिका, पृ. १७.

७. चिटणिस के. एन., उपरोक्त, पृ. ७४.

८. वैभवशाली वारकरी परंपरा, सोलापूर स्मरणिका, २०१०.

९. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास, प्राचीन काळ, खंड-१, पृ. ३९३-३९४, (संपा.) अरूण पाठक.

१०. नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार, २००८, पृ. १४३.

११. डिस्ट्रिक्ट सेन्सेस हॅंडबुक, १९६७, सोलापूर, पृ. २१.

१२. शर्मा रामशरण, उपरोक्त पृ. २-४.

१३. गर्गे स. मा., (संपा.) भारतीय समाजविज्ञान कोश, खंड -३, पृ. ५१२-५१३.

१४. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १६९ - १७०.

अ) बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, पृ. २२६.

१५. सोलापूर समाचार, १० ऑगस्ट, १९१५.

१६. कित्ता, १७ मे १९१६.

अ) सबकुछ सोलापूर, पृ. ४७.

१७. सोलापूर समाचार, १३ डिसेंबर १९४२.

१८. कित्ता, २ डिसेंबर १९४६.

१९. कित्ता, ५ डिसेंबर १९४६.

२०. सोलापूर समाचार, ४ ऑक्टोंबर १९६७ मधील मा. कृ. शिंदे, सेवानिवृत्त मामलेदार सोलापूर यांनी दिलेल्या निवेदनावरून.

२१. मुलाखत, विठ्ठल तिरूपती नल्ला, निलम नगर, सोलापूर.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, १२ नोव्हेंबर २०१३.

२२. पसारकर शे. द., (संपा.), श्री सिध्दरामेश्वरांची वचने, खंड-१, प्रस्तावना, पृ. १२.

२३. शेंडे एस. आर., मराठेकालीन धार्मिक जीवन, पृ. १०५.

२४. सोलापूर समाचार, १३ फेब्रुवारी १९३३.

२५. कित्ता, १९४१.

२६. कुलकर्णी वि. य., भारतीय कला उद्‌गम आणि विकास, पुणे, १९९६, पृ. ६६, ६७.

२७. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १७.

२८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २१९ - २२२.

२९. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १७०, १७१.

३०. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. १३.

३१. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २२२.

३२. सोलापूर समाचार, १६ जुलै १९४२.

३३. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २२३, २२४.

३४. दैनिक लोकमत, ८ ऑगस्ट २०१२.

३५. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २२४.

३६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ४ ऑगस्ट २०१३.

अ) सिमांत, दिवाळी अंक, यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई, सोलापूर, पृ. ५६.

३७. फडके ज. शा. (संकलन), आपली संस्कृती : सण उत्सव व प्रतिके, सोलापूर, २०११, पृ. ७.

३८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २१८, २१९.

३९. सोलापूर समाचार, १५ जानेवारी १९६४.

४०. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९८८.

४१. डायमंड महाराष्ट्र संस्कृती कोश, पृ. १६१, १९३.

४२. पसारकर शे. द., उपरोक्त पृ. ११.

४३. शतसंवत्सरिका ग्रंथ, पृ. २७१.

४४. पाटील म. आ., बसव पथ (त्रैमासिक), बसव समिती, बेंगलोर, २००७, पृ. ६४.

४५.	दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ९ जानेवारी २०१३.

४६.	जावळे सो. सं., (संपा.), सोलापूर शहर व परिसराचा इतिहास, सोलापूर, पृ. ११८ ते ११९.

४७.	जोशी महादेव शास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड-१०, पृ. ३६.

अ) पसारकर शे. द., उपरोक्त पृ. १२.

४८.	अंदुरकर व्ही. जी., सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे, १९५८, पृ. २४०-२४२.

४९.	मुलाखत, किरण जोशी, (पुजारी), जुने विठ्ठल मंदिर, सोलापूर.

५०.	डायमंड मराठी संस्कृती कोश, पृ. १८९.

५१.	पाटोळे अरविंद, श्री तुळजाभवानी महात्म्य, पृ. ४५ - ४६.

५२.	दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १७ ऑक्टोंबर २०१२.

५३.	सोलापूर समाचार, २९ ऑक्टोंबर १९०२.

५४.	कित्ता, २ ऑक्टोंबर १९०६.

५५.	शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त पृ. १५१.

५६.	डायमंड मराठी संस्कृती कोश, पृ. १९६, १९९.

५७.	सोलापूर समाचार, १६ सप्टेंबर १९०२.

५८.	कित्ता, ८ सप्टेंबर १९०३.

५९.	कित्ता, १५ सप्टेंबर १९४२.

६०.	कित्ता, १९ सप्टेंबर १९४५.

६१.	सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९९५.

६२.	सद्‌गुरू शुभराय महाराज चरित्र, श्री शुभराय मठ, सोलापूर, पृ. ८, ९.

६३.	भूर्के शाम, मुक्काम पोस्ट सोलापूर, पृ. १५.

६४.	सोलापूर समाचार, ६ नोव्हेंबर १९४६.

६५.	इराबत्ती आ. ल., माझ्या आयुष्यातील टिपणे, सोलापूर, १९७१.

६६.	५९ वा वार्षिक अहवाल, पद्‌मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर, २०१० - २०११, पृ. १-३.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, ३ ऑगस्ट २०१२.

६७.	कित्ता, पृ. ३ - ४.

**नारळीपोर्णिमा** अथवा 'नुल्लूपुल्लम' हा सण पद्‌मशाली लोक मार्कंडेय मुनीचे पुत्र वीर भावनाऋषीचा राज्याभिषेक दिन म्हणून साजरा करतात. नारळीपोर्णिमेदिवशी मार्कंडेय मंदिरातून मार्कंडेयांच्या रथाची मिरवणूक काढली जाते.

६८. मुलाखत, जनार्दन साखरे, अध्यक्ष, जिव्हेश्वर जन्मोत्सव समिती, सोलापूर.

६९. मुलाखत, सिध्दय्या स्वामी हिरेमठ, सोलापूर.

अ) दैनिक तरूण भारत, सोलापूर, २२ जुलै २०१२.

७०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १४ ऑगस्ट २०१२.

७१. दैनिक सकाळ, सोलापूर, २५ जुलै २०१३.

७२. खेर संजीवनी, धर्म, पृ. ५७.

७३. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. ५४१ - ४२.

**मोहरमः** 'मोहरम' च्या मूळ अरबी शब्दाचा अर्थ 'धिक्कार', 'निषिध्द' असा आहे. महमंद पैगंबराच्या मुलीचे मुलगे हसन व हुसेन यांना त्यांच्या शत्रूंनी म्हणजे सुन्नी पंथीयांच्या खलिफाने ठार मारले. त्या दुखःद प्रसंगाची आठवण म्हणून हा उत्सव साजरा केला जातो.

७४. सोलापूर समाचार, २२ एप्रिल १९०२.

७५. कित्ता, २४ जानेवारी १९७५.

**बारा इमामांची नांवेः** सय्यद असदुल्लाह-हिल-गालीब हजरत अली करम अल्लाह, हजरत सय्यदना इमाम हुसेन, हजरत सय्यदना इमाम जैनुल आबदीन, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद बरकर, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद जाफर सादिक, हजरत सय्यदना इमाम मुसा काझम, हजरत सय्यदना इमाम अली रजा, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद तकी, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद तकी, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद तकी, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद नकी, हजरत सय्यदना इमाम मु. हसन असबरी, हजरत सय्यदना इमाम महेदी आखुरूजमा.

७६. कित्ता, १२ मे १९३२

७७. मुलाखत, मकबुल मोहोळकर.

अ) सोलापूर समाचार, २२ फेब्रुवारी १९४०.

७८. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. ७२०.

७९. मुलाखत, अजमद अली काझी, शहर काझी, सोलापूर.

८०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ९ ऑगस्ट २०१२.

८१. दैनिक सकाळ, सोलापूर, १३ ऑगस्ट २०१२.

८२. उपरोक्त, ९ ऑगस्ट २०१२.

८३. मुलाखत, जैनुद्दीन पटेल, सोलापूर सोशल महाविद्यालय, सोलापूर.

८४. सोलापूर समाचार, १ एप्रिल १९६६ मधील महमंद इसाक हसनसाो कलवल यांच्या लेखावरून.

८५. सिमांत, दिवाळी अंक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या लेखावरून.

८६. सोलापूर समाचार, २६ डिसेंबर १९७४.

८७. दैनिक सोलापूर समाचार, २६ मे १९३०.

८८. येळेगांवकर श्रीकांत, सोलापूरचे स्वातंत्र्य लढ्यातील दिपस्तंभ, सोलापूर, २०११, पृ. ८१.
अ) सोलापूर समाचार, १७ मे १९१६.

८९. शहा सुमतीबाई, माझी जीवनगाथा (आत्मचरित्र), सोलापूर, १९८९, पृ. २७ - ३१.

९०. शहा विद्युलता, (संपा.), पद्मश्री सुमतीबाई शहा गौरवग्रंथ, सोलापूर, १९८७, पृ. ८८.

९१. शहा सुमतीबाई, उपरोक्त, पृ. ३० - ३२.

९२. शहा विद्युलता, उपरोक्त, पृ. ८८.

९३. येळेगांवकर श्रीकांत, उपरोक्त, पृ. ८३.

९४. शहा विद्युलता, उपरोक्त, पृ. ८७.

९५. येळेगांवकर श्रीकांत, उपरोक्त, पृ. ६२ - ६९.

९६. शहा सुमतीबाई, उपरोक्त, पृ. ६२ - ६९.

९७. नागावकर विकास, हे खोड चंदनाचे, शरयू शहा (प्रकाशिका), मुंबई, २०१३, पृ. ११४-११५ .

९८. सिध्दचेतन स्मरणिका, २००७, गडीनाड साहित्य संमेलन सोलापूर, पृ. ४३.

९९. कित्ता, पृ. ४५

१००. नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. ३२.

१०१. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ३० जून २०१२.

१०२. कवि शुभराय मठातील माहितीच्या आधारे.

१०३.	दैनिक सकाळ, सोलापूर, २० ऑगस्ट २०१३.

१०४.	पाखर संकुल अनाथाश्रम, कवि शुभराय मठ, माहिती पत्रकावरुन, २०१३.

१०५.	स्मरणिका, दंडवते महाराज गुहा (मठ) सोलापूर.

१०६.	ज्ञान प्रबोधिनी संस्था, सोलापूर पौरोहित्य विभागाच्या माहिती पत्रकावरून.

१०७.	भूर्के शाम, उपरोक्त, पृ. ७४ - ७५.

१०८.	मुलाखत, अपर्णा कल्याणी, महिला पुरोहीत, सोलापूर.

१०९.	दैनिक सकाळ, सोलापूर, २ जानेवारी २०१३.

११०.	मांडे प्रभाकर, लोक साहित्याचे स्वरूप, १९८९, पृ. २५३ - २५४.

१११.	राजाध्यक्ष विजया, मराठी वाङ्मय कोश, खंड-४, पृ. ४०६.

११२.	मुलाखत, अर्जून व्हटकर, वालचंद महाविद्यालय, सोलापूर.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, २१ जुलै २०१०.

११३.	कवि राघवांक, सिध्दराम चरित्र (अनु. रामराव आर. एस.), कन्नड साहित्य परिषद, बेंगलोर, १९७७, पृ. १८.

११४.	कुंभार आनंद, संशोधन तरंग, पृ. ६९.

११५.	उपरोक्त, पृ. ७० (शिलालेख क्रमांक १, ओळ क्रमांक ९).

**शिलालेख-** मल्लिकार्जून देवरिगे, अणदूर, मुन्नुरशेळगे बिट्ट आय मोनेगोम्मान भ.

११६.	श्री सिध्देश्वर चरित्र (संपा.), सुदर्शन सोलापूर, पृ. ५८.

११७.	कोसंदर प. रे., संस्थानिक संस्थापक आणि ५० वर्षापूर्वीचे व्यापारी, सोलापूर.

११८.	जक्कल बाबुराव, सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ९.

अ) बुवा परिवार अंकित माहिती, कवि शुभराय मठ, सोलापूर, पृ. ९.

११९.	सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९७९ - ८०.

१२०.	जक्कल बाबुराव, उपरोक्त, पृ. ५८.

१२१.	सीमांत, दिवाळी अंक, २००८, पृ. ३४.

१२२.	कित्ता.

१२३.	शेंडे एस. आर., मराठेकालीन धार्मिक जीवन, पृ. ९५.

१२४.	टिकेकर अरूण, स्थळकाळ, पृ. १३२.

१२५. अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, पृ. ५३.

१२६. फारूक सय्यद नसीम, ऐनेमे इरलाही व फलाही तनजीम, सोलापूर, १९९९, पृ. ५९ - ६०.

१२७. सोलापूर समाचार, १० डिसेंबर १९६५, महमद इसाक हासनसाो कलवल, यांच्या लेखारून.

१२८. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, सोलापूर, १९४९, पृ. २१६.

अ) श्री सिध्देश्वर चरित्र, सुदर्शन सोलापूर, पृ. ५९ - ६०.

१२९. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९८८.

१३०. जावळे सो. सं., उपरोक्त, पृ. ११९.

१३१. सोलापूर समाचार, १० जानेवारी १९५७.

अ) कित्ता, १० जानेवारी १९७४.

१३२. कित्ता, ९ सप्टेंबर १९४२.

१३३. दैनिक तरूण भारत, सोलापूर, २२ जुलै २०१२.

१३४. दैनिक सकाळ, सोलापूर, २५ जुलै २०१३.